रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २३३
www.ramprahar.com

सोमवार, ११ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

अंतोरे खाडी पुलावरून पडून विवाहितेचा मृत्यू/२

वळके येथील जंगलात गोळीबार; गुन्हा दाखल/५

सानव वॉरियर्स संघ चिरनेर प्रीमियर लीगचा मानकरी/८

## ठाकरे गटाचे आमदार रवींद्र वायकर शिवसेनेत दाखल



**मुंबई :** माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे निकटवर्तीय आणि आमदार रवींद्र वायकर यांनी रविवारी (दि.१०) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत वर्षा बंगल्यावर शिवसेनेत प्रवेश केला. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, बाळासाहेबांनी जो विचार दिला तो पुढे नेण्यासाठी आम्ही प्रयत्न करीत आहोत. वायकर यांनी घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे. त्यांनी त्यांच्या मतदारसंघातील प्रश्न मला सांगितलेले आहेत ते सोडविण्याचा सरकार म्हणून मी प्रयत्न करणार आहे; तर आमदार वायकर यांनी, मुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे वेगवेगळे निर्णय घेत आहेत. माझे प्रश्न सुटले नाहीत तर मी लोकांसमोर जाऊ शकत नाही. त्यामुळे मी शिवसेनेमध्ये येण्याचा निर्णय घेतला आहे, असे स्पष्ट केले.

# देशातील अत्याधुनिक सायबर लॅब नवी मुंबईत

### उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती | मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे पनवेलमध्ये उद्घाटन

**पनवेल : वार्ताहर**

महाराष्ट्र शासनाने सायबर प्रकल्प हाती घेतला आहे. या अंतर्गत नवी मुंबईत देशातील सर्वांत अत्याधुनिक सायबर लॅब उभारण्यात आली आहे. यामुळे आर्थिक गुन्हे घडल्यानंतर कमीत कमी वेळात त्यांना अटकाव करणे शक्य होणार आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रविवारी (दि.१०) पनवेल येथे केले.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातंर्गत मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाचे उद्घाटन उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या आवारात झाले. या वेळी ते बोलत होते.



या कार्यक्रमास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, आमदार गणेश नाईक, आमदार मंदाताई म्हात्रे, माजी खासदार संजीव नाईक, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहआयुक्त संजय येनपुरे, कोकण विभागीय आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर, नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर, रायगडचे जिल्हाधिकारी किसन जावळे, अपर पोलीस आयुक्त दीपक साकोरे उपस्थित होते. या वेळी एनआरआय व तळोजा पोलीस ठाणे येथील पुरावा व्यवस्थापन कक्षाचे ऑनलाईन उद्घाटन झाले. (पान २ वर..)

### अमली पदार्थांविरोधात प्रभावी अंमलबजावणी

राज्य शासनाने अमली पदार्थांविरोधात प्रभावी पाऊले उचलली आहेत. या संदर्भात झिरो टोलेरन्स पॉलिसी आणली आहे. ड्रग्जविरोधात महाराष्ट्र पोलिसांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. त्याचे निश्चितच कौतुक आहे, पण या प्रकरणात पोलीस सहभागी अथवा दोषी आढळून आल्यास बडतर्फ करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याचे सांगून पोलीस दल प्रभावीपणे काम करेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या वेळी व्यक्त केला.

## इंडिया आघाडीला सुरूंग

### लोकसभेसाठी 'तृणमूल'कडून सर्व उमेदवारांची घोषणा

**कोलकाता : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडीला मोठा धक्का बसला आहे. येथे तृणमूल काँग्रेसने लोकसभेच्या सर्व ४२ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले आहेत. गेल्या काही दिवसांपासून इंडिया आघाडी म्हणून काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जागावाटपावर चर्चा चालू होती, मात्र तृणमूलने आपले उमेदवार जाहीर केल्यामुळे येथे इंडिया आघाडीला सुरूंग लागला आहे.

तृणमूल काँग्रेसने महुआ मोईत्रा यांना पुन्हा एकदा तिकीट दिले आहे. संसदेत प्रश्न विचारण्यासाठी मोईत्रा यांनी पैसे घेतल्याचा आरोप झाला होता. याउपरही पक्षाने मोईत्रा यांना कृष्णानगर येथून लोकसभेचे तिकीट दिले आहे. याशिवाय तृणमूलने क्रिकेटपटू युसुफ पठाणलाही लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. तो बहरामपूर येथून निवडणूक लढवेल.

गेल्या काही दिवसांपासून इंडिया आघाडीच्या माध्यमातून काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जागावाटपावर चर्चा चालू होती. काँग्रेस पक्षाला तृणमूल पक्ष अवघ्या दोन जागा देण्यास तयार



होता, तर काँग्रेसला आणखी जागा हव्या होत्या. जागावाटपावर ठोस तोडगा निघत नसल्यामुळे ममता बॅनर्जी यांनी काही दिवसांपूर्वी आम्ही लोकसभेची निवडणूक स्वबळावर लढवणार आहोत, अशी घोषणा केली होती तसेच आमची इंडिया आघाडीशी जागावाटपासंदर्भात कोणतीही चर्चा चालू नाही, असेही स्पष्ट केले होते. त्यानंतर संयमाची भूमिका घेत काँग्रेसने तृणमूल काँग्रेसशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला होता. या चर्चेतून कोणताही ठोस निष्कर्ष निघत नसल्यामुळे आता शेवटी तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालच्या सर्व ४२ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडी संपुष्टात आल्याचे स्पष्ट झाले आहे.

## श्रीवर्धन येथील श्रीमंत पेशवे स्मारकाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते भूमिपूजन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

श्रीवर्धन येथील श्रीमंत पेशवे स्मारकाचे भूमिपूजन कृषीमंत्री धनंजय मुंडे तसेच खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते रविवारी (दि.१०) झाले

या समारंभास महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, पुष्करसिंह पेशवा, डॉ.तेजस दर्गे, महमद मेमन, जितेंद्र सातनाक, दर्शन विचारे, श्यामकांत भोकरे, श्रीवर्धन नगर परिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे आदी उपस्थित होते.

या वेळी कृषीमंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचे मराठा साम्राज्य हे रयतेचे राज्य होते. अठरा पगड जातींना, बारा बलुतेदारांना, सर्व धार्मियांना सोबत घेत हिंदवी स्वराज्याची उभारणी शिवरायांनी केली. ऐतिहासिक पद्धतीची उभारणी करीत असताना अनेक वेळेला संघर्षाला सामोरे जावे



लागले होते. त्यानंतर श्रीमंत बालाजी विश्वनाथ पेशवे यांच्याकडे पेशव्यांची सूत्रे हातामध्ये आल्यानंतर ऐतिहासिक लढाईत संबंध पेशवे घराण्याचे योगदान खूप मोठ्या प्रमाणावर होते. रायगडकर खूप भाग्यवान आहेत. याचे कारण शिवरायांच्या स्वराज्याची राजधानी असलेला किल्लासुद्धा रायगडमध्ये. त्यानंतर ज्यांच्याकडे पेशवाईची सूत्रे दिली गेली ते पेशवेदेखील रायगडमधलेच आहेत. (पान २ वर..)

## पुणे, कोल्हापूर विमानतळ नूतन टर्मिनलचे उद्घाटन

**पुणे, कोल्हापूर :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोहगाव येथील पुणे विमानतळाच्या नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीचे तसेच कोल्हापूर विमानतळाच्या नूतन टर्मिनलचे दुरदृष्यप्रणालीद्वारे रविवारी (दि.१०) उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आदी उपस्थित होते. (सविस्तर वृत्त पान २ वर..)

## निवडक

### चेक प्रजासत्ताकची क्रिस्टिना पिस्कोव्हा ठरली यंदाची विश्वसुंदरी

**मुंबई :** जवळपास दोन दशकांनंतर भारतात मिस वर्ल्ड स्पर्धेचा ग्रँड फिनाले पार पडला. मुंबईच्या जिओ सेंटरमध्ये यासाठी जगभरातील सौंदर्यवती, फॅशन विश्वामधील दिग्गज आणि मनोरंजन दुनियेतील तारे दाखल झाले होते. यंदा साऱ्यांचेच लक्ष होते ते अंतिम फेरीत पोहचलेल्या भारताच्या सिनी शेट्टीकडे, पण या किताबावर चेक प्रजासत्ताकच्या क्रिस्टिना पिस्कोव्हाने नाव कोरले.

### अमोल कीर्तिकर यांच्या उमेदवारीवर निरुपमांची टीका

**मुंबई :** महाविकास आघाडीत जागावाटप झालेले नसताना माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी शनिवारी अमोल कीर्तिकर यांना मुंबई उत्तर-पश्चिम लोकसभा मतदारसंघातून ठाकरे गटाचे उमेदवार म्हणून घोषित केले. यावर काँग्रेस नेते संजय निरुपम भडकले असून सोशल मीडियावर पोस्ट करीत त्यांनी उद्धव ठाकरे आणि अमोल कीर्तिकर यांच्यावर टीका केली आहे.

## माथेरानमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या ई-रिक्षा हातरिक्षाचालकांना मिळतील -आमदार प्रशांत ठाकूर

**कर्जत : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी महिलावर्गाच्या सक्षमीकरणासाठी नियोजनबद्ध कार्यक्रम राबवत आहेत. त्यामुळे महिलाशक्तीला मोदी सरकार व भाजप करीत असलेल्या विविध योजनांची माहिती देण्यासाठी आलो असून माथेरानमधील नव्याने दाखल होणाऱ्या ई-रिक्षा या स्थानिक हातरिक्षाचालकांनाच देण्यात येतील, असा विश्वास भाजपचे मावळ लोकसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी व्यक्त केला.

माथेरान येथील भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून जागतिक महिला दिनानिमित्ताने शनिवारी (दि.९) असेम्ब्ली हॉलमध्ये विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. या कार्यक्रमास



भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कर्जत विधानसभा मतदारसंघ निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, कर्जत तालुका अध्यक्ष राजेश भगत, जिल्हा चिटणीस मंगेश म्हसकर, महिला मोर्चा प्रदेश सचिव मृणाल खेडकर, मनीषा केळकर, उपाध्यक्ष बीनिता घुमरे, सोशल मीडिया जिल्हा समन्वयक ॲड. गायत्री परांजपे, नम्रता कांदळगावकर, भाजप माथेरान शहर अध्यक्ष प्रवीण सकपाळ, कर्जत शहर अध्यक्ष बळवंत घुमरे, माथेरानचे माजी नगराध्यक्ष अजय सावंत, माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, माजी सभागृह नेते प्रसाद सावंत, नेरळ ग्रामपंचायत सदस्य संतोष शिंगाडे, श्रद्धा कराळे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, जागतिक महिला दिनानिमित्ताने महिलांचा सागर उसळला आहे. या महिलाशक्तीचा आवाज बुलंद करण्याचे काम देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी करीत असून महिलांना सन्मानाने जगण्यासाठी त्यांनी अनेक योजना आणल्या आहेत. महिलावर्गासाठी मातृ वंदन योजना, महिला बचत गटांना सक्षम करण्यासाठी निधीही देऊ केला आहे. नवीन जन्माला येणाऱ्या बाळाच्या नावापुढे आईचे नाव लागणार आहे. त्यातून महिलांचा सन्मानच होत आहे. राज्यात महिला सक्षमीकरण योजना जाहीर केली आहे. महिलांच्या उद्योगांना आर्थिक बळ देण्याचे काम आमचे सरकार करीत आहे. २०२९मध्ये तर महिलावर्गासाठी खासदार आणि आमदार यांच्यासाठीदेखील आरक्षण राहणार आहे. महिला सक्षमीकरणासाठी पंतप्रधान मोदींकडून नियोजन केले जात आहे. (पान २ वर..)

## मंत्री, गटनेतेपदामध्ये डावलले

### आमदार भास्कर जाधव यांची उद्धव ठाकरेंवर जाहीर नाराजी



**चिपळूण : प्रतिनिधी**

राष्ट्रवादीत असताना मी मंत्री होतो, मात्र शिवसेनेत आल्यावर सिनिअर वगैरे दाखवले नाही. मंत्रिपद मिळाले नाही. पुढे ज्या वेळी पक्ष फुटला त्या वेळी गटनेता बदलण्याची वेळ आली. मी तिथे होतो, पण पक्षाने मला गटनेता केले नाही, असे म्हणत आमदार भास्कर जाधव यांनी आपली नाराजी जाहीरपणे बोलून दाखवली आहे. त्यांचा रोख ठाकरे गटाचे प्रमुख व माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर होता.

आमदार भास्कर जाधव यांची सभा रविवारी (दि.१०) चिपळूण येथे झाली. त्या वेळी ते बोलत होते. ज्या वेळेला मंत्रिमंडळाचा विस्तार झाला त्या वेळेला मी एका वृत्तवाहिनीशी बोलताना एकच वाक्य म्हटले होते की माझा हक्क होता, मला मंत्रिपद मिळायला हवे होते. तेव्हा मला पत्रकारांनी प्रश्न विचारला तुम्ही नाराज आहात का? मी अन्याय हा शब्द न वापरता यत्किंचतही नाराज नाही. हा विषय तुम्ही आजपासून सोडून द्या, असे उत्तर दिले, असे आमदार जाधव म्हणाले. आता यावर उद्धव ठाकरे काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहे.

## रायगडात ५३२ शिक्षकांची नियुक्ती

### समुपदेशन प्रक्रिया पूर्ण; हजर होण्याच्या सूचना

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा परिषदेच्या मराठी आणि सेमी इंग्रजी मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळांमध्ये पदस्थापनेसाठी ५५२ शिक्षक पात्र ठरले होते. यापैकी समुपदेशनासाठी हजर राहिलेल्या ५३२ शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे. मराठी माध्यमाच्या शिक्षकांची समुपदेशन प्रक्रिया शनिवारी (दि. ९) पार पडली. या शिक्षकांना त्वरित नियुक्तपत्रही देण्यात आले असून हजर होण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत.

रायगड जिल्हा परिषदेच्या सभागृहात मराठी माध्यमाच्या शिक्षकांची समुपदेशन प्रक्रिया शनिवारी झाली. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रभारी सत्यजित बडे, शिक्षणाधिकारी पुनिता गुरव याच्या उपस्थितीत ही प्रक्रिया राबवण्यात आली. मराठी माध्यमाच्या मराठी आणि सेमी इंग्रजी पदस्थापनेसाठी ५५२ शिक्षक पात्र ठरले होते. यापैकी ५३२ महिला व पुरुष शिक्षक उमेदवार हजर होते.

समुपदेशनासाठी आलेल्या शिक्षकाला हवी असलेली शाळा निवडण्याचा पर्याय दिला होता. यामध्ये शून्य शिक्षकी, अवघड क्षेत्र, सर्वसाधारण असा क्रम तालुकानिहाय देण्यात आला होता. बहुतांश शिक्षकांची शहरापासून जवळच्या शाळा निवडण्यासाठी धडपड सुरू होती. त्यामुळे अवघड क्षेत्र, शून्य शिक्षकी शाळा निवडताना टाळाटाळ केली जात होती. ५३२ शिक्षकांसाठी ५३२ शाळा पर्याय ठेवल्याने अखेर सर्वच शाळांवर शिक्षक देण्यात आले आहेत. यातील ३०५ शिक्षिका आहेत.

रायगड जिल्ह्यात भरतीसाठी आलेले बहुतांश शिक्षक पश्चिम महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा, खान्देश येथून आले आहेत. अनेकांना जिल्ह्याची भौगोलिक माहिती नाही. त्यामुळे सोयीची, प्रवास करण्यास सुलभ अशी सुगम क्षेत्रातील शहरापासून जवळची नियुक्ती मिळावी यासाठी शिक्षकांची धडपड दिसून आली.

## आमदार महेश बालदी यांच्या हस्ते विविध विकासकामांचे भूमिपूजन





**रसायनी : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार महेश बालदी यांच्या मागणी व पाठपुराव्यातून विविध विकासकामांचे भूमिपूजन तसेच निरनिराळ्या योजनांतंर्गत बाबींचे लाभार्थ्यांना वाटप शनिवारी (दि.९) आपटा सारसई बागेचीवाडी येथे करण्यात आले. या सोहळ्यास आमदार महेश बालदी आणि भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या वेळी माडभुवन आदिवासीवाडीचे भूखंड वाटप, सभागृहाचे भूमिपूजन, आदिम घरकुल योजनेंतर्गत गृहप्रवेश, आदिवासी विकास प्रकल्प योजनेंतर्गत मच्छीमार बोटींचे व जाळ्यांचे वाटप, जलजीवन मिशन नळ पाणीपुरवठा योजना भूमिपूजन, बाळूमामा मंदिर कोनशिला पूजन तसेच कातकरी समाजाला प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.

या सोहळ्यास माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, केळवणे जि.प. विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, गुळसुंदे जि.प. विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, कर्नाळा विभागीय अध्यक्ष चंद्रकांत पाटील, आपटे पं.स. अध्यक्ष संदीप पाटील, जांभिवली ग्रामपंचायतीच्या सरपंच रिया कोंडीलकर, सावळे सरपंच सुनील माळी, आपटा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्ता पाटील, गिरवलेचे माजी सरपंच आत्माराम हातमोडे, कराडे खुर्द ग्रामपंचायतीचे माजी सरपंच किरण माळी, विजय मुरकुटे, कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्याधर जोशी, राजू पाटील, साईचे माजी सरपंच विद्याधर मोकल यांच्यासह मनोहर भोईर, ज्ञानेश्वर भोईर, राकेश गायकवाड, गजानन पाटील, अखलाक बडे, भैय्याशेठ, दिनेश पाटील, रवि चितळे, सामाजिक कार्यकर्ते रत्नाकर घरत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे, कोल्हापूरमध्ये विमानतळ नूतन टर्मिनलचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

**पुणे, कोल्हापूर : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते लोहगाव येथील पुणे विमानतळाच्या नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीचे व कोल्हापूर विमानतळाच्या नूतन टर्मिनलचे दुरदृष्यप्रणालीद्वारे उद्घाटन करण्यात आले. या नव्या टर्मिनलमुळे देशातील सामान्य माणसासाठी विमान प्रवास अधिक सुलभ आणि सुखकर होईल, असे प्रधानमंत्री मोदी या वेळी म्हणाले.




कार्यक्रमाला कोल्हापूर येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तर पुणे विमानतळ येथे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील उपस्थित होते.

कोल्हापूरच्या कार्यक्रमांतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कोल्हापूर विमानतळाच्या या नवीन इमारतीची पाहणी करून हे विमानतळ कोल्हापूर जिल्ह्याच्या पर्यटन विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडेल, असे मत व्यक्त केले. तसेच पुणे शहराला साजेसे भव्य आणि आधुनिक, पुणे शहराच्या संस्कृतीची अनुभूती करून देणारे टर्मिनल अस्तित्वात आल्याबद्दल केंद्र सरकारला धन्यवाद देऊन या वेळी उपमुख्यमंत्रीफडणवीस म्हणाले, पुणे हे एक महत्वाचे शहर आहे. पुणे जिल्हा महाराष्ट्राचे मॅन्युफॅक्चरिंग आणि आयटी हब आहे. देश-विदेशातून अनेक नागरिक पुण्यात येतात. एवढ्या मोठ्या प्रमाणात प्रवाशांना सुविधा देण्यासाठी जुने टर्मिनल अपूरे होते. संरक्षण मंत्रालयाला विनंती करण्यात येऊन नव्या इमारतीसाठी जागा उपलब्ध झाली आणि त्यामुळे भव्य टर्मिनल उभे राहिले आहे.

महाराष्ट्राचे प्रेरणास्त्रोत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य पुतळा इमारतीच्या बाहेर उभारण्यात आला आहे. श्री विठ्ठलाचे म्युरल, वारली कला, देशी खेळ मल्लखांब आदींचे दर्शन या इमारतीत घडते. आपल्या स्थानिक संस्कृतीला साजेसे वातावरण इमारतीत आहे. विमानतळावर स्थानिक उत्पादनांची विक्री करता येणार आहे. एक परिपूर्ण टर्मिनल आपल्याला मिळाले आहे. कोल्हापूरलादेखील मराठा साम्राज्याला साजेसे असे टर्मिनल उभे रहात आहे. महाराष्ट्रातही विमानतळाच्या धावपट्यांना विकसीत करून विमानतळांचे जाळे निर्माण करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**असे आहे पुणे विमानतळ**

डॉ. एच. श्रीनिवास यांनी प्रास्ताविकात पुणे विमानतळाच्या नवीन एकात्मिक टर्मिनल इमारतीतील सुविधांची माहिती दिली. भारतीय विमानतळांना आधुनिक सुविधा देण्यात येत आहे. विमानतळावर स्थानिक संस्कृतीला प्रदर्शित करण्यात येत आहे. पुणे विमानतळाच्या एकात्मिक टर्मिनल इमारतीचे क्षेत्रफळ ५२ हजार चौ.मीटर असून सर्वाधिक व्यस्त वेळेत ३ हजार प्रवासी क्षमता आहे, अशी त्यांनी दिली.

**असे आहे कोल्हापूर विमानतळ**

नवीन टर्मिनल इमारतीचे क्षेत्रफळ ३९०० चौ.मी असून तासी प्रवाशी क्षमता ५०० आहे. वार्षिक क्षमता ५ लाख प्रवाशी आहे. वाढीव हवाई कनेक्टिव्हिटी पर्यटन, व्यवसाय, शिक्षण आणि रोजगार निर्मितीला चालना देऊन कोल्हापूरच्या आर्थिक समृद्धीसाठी आवश्यक आहे. कोल्हापूर विमानतळाच्या विकासामुळे या भागातील हस्तकला उद्योगाच्या वाढीस मदत होईल.

## सुकापूरमध्ये वेश्याव्यवसाय चालणाऱ्या लॉजवर छापा

### व्यवस्थापकासह जोडपे अटकेत

**पनवेल : वार्ताहर**

पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने सुकापूर येथील साई सम्राट लॉजवर छापा मारून त्याठिकाणी वेश्याव्यवसाय चालवणारे लॉजचे व्यवस्थापक व वेश्याव्यवसायासाठी महिला पुरवणारे जोडपे अशा चौघांना अटक केली. या कारवाईत पोलिसांनी वेश्यागमनासाठी लॉजमध्ये आलेल्या चौघींची सुटका केली.



नवीन पनवेलमधील सुकापूर येथील साई सम्राट लॉजमध्ये व्यवस्थापक वेश्याव्यवसाय करीत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्यानुसार पोलीस पथकाने लॉजवर छापा मारला. या वेळी वेश्याव्यवसायासाठी चार मुली व महिला ठेवण्यात आल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्या महिलांकडे चौकशी केली असता, त्यांना सबिना मोमीन मुल्ला (वय ३६) व जियारुल जोहरुल हक (वय ३४) या दोघांनी सुकापूर भागातील भगतवाडी येथील एका घरामध्ये ठेवल्याचे सांगितले, तसेच त्यांना व्यवस्थापकाच्या मागणीनुसार वेश्याव्यवसायासाठी सदर लॉजमध्ये पाठवत असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी संतोष साकेत (वय ४२) व अर्जुन गोस्वामी (वय ३६) या लॉज व्यवस्थापकाला अटक केली. त्यानंतर पोलिसांनी भगतवाडी येवून सविना मुळा व जियारुल हक या जोडप्याला अटक केली.

या कारवाईत पोलिसांनी चौघांसह लॉजचे मालक बालाजी व चिना या सहा जणांविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. तसेच वेश्याव्यवसायासाठी आलेल्या चारही महिलांची सुटका केली.

## श्री पाटणेश्वराची पालखी मिरवणूक

### आमदार अनिकेत तटकरे यांचा सहभाग



**पेण : प्रतिनिधी**

महाशिवरात्री दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार अनिकेत तटकरे यांनी पेण तालुक्यातील स्वयंभू श्री पाटणेश्वराचे दर्शन घेतले तसेच श्री विश्वेश्वर मंदिरात जाऊन ही त्यांनी मनोभावे पूजा केली. या वेळी आयोजित कार्यक्रमा प्रसंगी त्यांनी पालखी मिरवणूक सोहळ्यात सहभागी होत महादेवाचा जय जयकार केला.

या वेळी त्यांच्यासोबत पेण तालुका अध्यक्ष दयानंद भगत, पेण विधानसभा अध्यक्ष नरेंद्र ठाकूर, पेण शहराध्यक्ष जितेंद्र ठाकूर, युवक अध्यक्ष विकास पाटील, शहर महिला अध्यक्ष सुचिता चव्हाण, जिल्हा ओबीसी सेल उपाध्यक्ष यशवंत घासे, पेण युवक अध्यक्ष सागर हजारे, महिला जिल्हा चिटणीस मिनाक्षी पाटील, ग्रामपंचायत सदस्य रिया ठाकूर, आनंद जाधव, अमित भगत, अमित पाटील, पेण विधानसभा सचिव प्रभाकर लांगी, माजी नगरसेवक बाबू पेडामकर युवक उपाध्यक्ष आदित्य पाटील, आदींनी दर्शन घेतले.

## नगररचनाकार पदासाठी बनावट प्रमाणपत्र सादर; पनवेल मनपामध्ये गैरप्रकार उघडकीस

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिकेच्या सरळसेवा भरती प्रक्रियेत नगररचनाकार पदासाठी सर्वाधिक गुण मिळवून राज्यात पहिल्या आलेल्या उमेदवाराला बनावट अनुभवपत्र सादर केल्यामुळे नोकरी गमवावी लागली आहे. पदाच्या निवड प्रक्रियेत असलेल्या उमेदवाराने नगररचनाकार पदावरून स्वतःहून माघार घेतली पालिका अधिकाऱ्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता उमेदवाराच्या कागदपत्रांची काटेकोर छाननी केली. त्यामुळे हा गैरप्रकार उघडकीस आणू शकले.

गेल्या डिसेंबरमध्ये पनवेल महापालिकेची ४१ संवर्गातील ३७७ पदांसाठी सरळ सेवेमार्फत भरती प्रक्रिया पालिकेने 'टीसीएस' कंपनीच्या माध्यमातून झाली. राज्यभरातून या प्रक्रियेत ५४,५५८ उमेदवारांनी सहभाग घेतला. त्यातील नगररचनाकार पदासाठी सर्वाधिक गुण मिळालेल्या आणि राज्यातील २० केंद्रांतून सर्वाधिक गुण मिळालेल्या उमेदवाराच्या कागदपत्रांची छाननी पालिका समितीने केली. त्यात संबंधित उमेदवाराच्या अनुभवपत्राबाबत संशय निर्माण झाला. चार ओळीचे अनुभवपत्र या उमेदवाराकडे असल्याने या उमेदवाराला त्यांचे वेतनपत्र, बँकेत जमा झालेल्या वेतन रकमेचा तपशील, ज्या संस्थेत कामाला होते तो कालावधी, त्या कंपनीने संबंधित उमेदवाराला दिलेल्या वेतनावर आयकर भरणा केलेला तपशील अशा विविध कागदपत्रांची पूर्तता करण्याचे पत्र दिल्यानंतर संबंधित उमेदवाराने काही बड्या मंडळींच्या आधारे पालिकेच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

ओळखीच्या आधारे काहीही प्रतिसाद मिळत नाही, हे स्पष्ट झाल्यावर त्याने पालिका आयुक्तांच्या ओळखीसाठी प्रयत्न सुरू केले, मात्र त्यादरम्यान पालिकेच्या भरती प्रक्रियेसाठीच्या कागदपत्र पडताळणी समितीने संबंधित उमेदवाराला तीन दिवसांत संबंधित कागदपत्रे व पुरावा न सादर केल्यास प्रतीक्षा यादीवरील अन्य उमेदवाराला संधी देण्याची तरतूद असेल, असे नमूद करून ते संकेतस्थळावर प्रसिद्ध केले.

## प्रभाकर देशमुख यांना पुरस्कार

**चौक : प्रतिनिधी**

चौक सारंगचे प्रतिष्ठित नागरिक, ज्येष्ठ समाजसेवक, आधार चॅरिटेबल ट्रस्ट आणि देशमुख मराठा समाजाचे अध्यक्ष प्रभाकर दत्तात्रेय देशमुख यांना साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठान यांच्या वतीने जीवन गौरव हा शिवसन्मान पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला.



प्रभाकर देशमुख यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठान यांच्या वतीने त्यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश जाधव, शिंदे सर, सौ. शिंदे, हेमंत झुंजारराव यांच्यासह साहित्य प्रेमी, सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

## अंतोरे खाडी पुलावरून पडून विवाहितेचा मृत्यू

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वरेडी गावातील राहणारे दाम्पत्य शहरात रात्रीच्या सुमारास फिल्म बघून रात्री एक वाजण्याच्या सुमारास अंतोरे पुलावरून घरी जात असताना विवाहित महिलेचा नदिपात्राजवळ तोल जाऊन मृत्यू झाल्याची घटना शनिवारी (दि. ९)घडली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तालुक्यातील वरेडी येथे राहणारे प्रशांत चंद्रकांत पाटील (वय २५) व त्याची पत्नी स्नेहा प्रशांत पाटील (वय २०) हे दाम्पत्य शहरात सिनेमा पाहण्यासाठी गेले होते. रात्री सिनेमा पाहिल्यानंतर जवळपास एक वाजण्याच्या सुमारास घरी वरेडी येथे जाताना ते मोटरसायकलने अंतोरे पुलाजवळ आले. असता मोटरसायकलस्वार प्रशांत याच्या डोळ्यात कचरा गेला असल्याने पत्नी स्नेहा ही खाली उतरून मोबाईल बॅटरीच्या सहाय्याने नवऱ्याच्या डोळ्यातील कचरा पाहत होती.

या वेळी तिचा अचानक तोल जाऊन ती पुलाखालील पाण्यात पडली. तिला वाचवण्यासाठी तिच्या नवऱ्याने तिला हात दिला, परंतू तोही मोटरसायकलसह खाली पडला. त्यावेळी तिथे झालेल्या आरडाओरडा नंतर आलेल्या नागरिकांनी प्रशांत पाटील याच्यासह मोटारसायकल वर काढली, मात्र रात्रीचा पाण्याचा अंदाज न आल्यामुळे आजुबाजुला अडकून पडलेल्या स्नेहा पाटीलचा मृतदेह दोन तासानंतर नागरिकांच्या हाती लागला.

याबाबत पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.



पनवेल : प्रबुद्ध सामाजिक संस्था व प्रबुद्ध महिला मंडळाच्या वतीने जागतिक महिला दिन करंजाडेमध्ये साजरा करण्यात आला. या वेळी प्रबुद्ध संस्थेचे व प्रबुद्ध महिला मंडळाच्या पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## चिंचवली तर्फे आतोणे गावात आरोग्य, शासकीय योजनांच्या शिबिराला प्रतिसाद

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुका भाजपा अध्यक्ष अमित घाग यांच्या मार्गदर्शनाखाली व भाजप रोहा तालुका उपाध्यक्ष रवींद्र तारू यांच्या नेतृत्वाखाली रोहे तालुक्यातील चिंचवली तर्फे आतोणे ग्रामपंचायत हद्दीत उन्नती हॉस्पिटल व आयसीयु पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ९) जय फार्म राजीव अमृते हंडेवाडी येथे शासकीय योजना व मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून परिसरातील ५०० जणांनी या शिबिराचा लाभ घेतला.

शिबिरावेळी पांडुरंग वराल,समाधान पाटील, श्रीकांत किल्लेकर, प्रतीक पानकर, प्रियंका पाटिल, वर्षदा पाटिल, राजू अमृते, माजी सरपंच छाया तारू, हाजी कोठारी, विठ्ठल पवार, दिनकर सानप, विनायक दिवेकर, सुनील म्हस्के, नारायण भोईटे, नारायण शिंदे,भास्कर चोरगे, सचिन मुसळे ,गजानन जाधव, प्रतीक पानकर ,आदित्य घायले, श्रीकांत किल्लेकर आदि मान्यवर उपस्थित होते.

उन्नती हॉस्पिटल आयसीयु, पनवेल यांच्या सहकार्याने भाजपचे रोहा तालुका उपाध्यक्ष रवींद्र तारू यांच्या माध्यमातून मोफ़त आरोग्य तपासणी शिबिर व शासकीय योजनेच्या शिबिर आयोजित करण्यात आले होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी संतोष शिर्के, संतोष मोरे,हसंजय मुसळे, राहुल पडवळ,दयाराम महाडिक, सीताराम जाधव, गण्या पवार, अनिल शेंडगे, यशवंत शेडगे, अशोक महाडिक, सुनील घोसाळकर, मंगेश आमुस्कर सुरेश महाडिक, रोशन बरस्कर, विठ्ठल शिर्के, संजय महाडिक यांनी मेहनत घेतली.



पान १ वरुन

## देशातील अत्याधुनिक सायबर लॅब नवी मुंबईत

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयातंर्गत उभारण्यात आलेला मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्ष हे कायद्यातील नवीन संहितेला अनुसरून असलेले देशातील पहिले आयुक्तालय आहे. राज्यातील जनतेचा पोलिस यंत्रणेवरील विश्वास वाढावा यासाठी आगामी काळात राज्यातील सर्व पोलीस घटकात हे कक्ष तयार करण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले, केंद्र शासनाने ब्रिटिशकालीन कायद्यामध्ये भारतीय नागरिकांना केंद्रबिंदू मानून गुणात्मक बदल केले आहेत. १०० वर्ष जुन्या कायदयामध्ये तंत्रज्ञानाने होणारे गुन्हे, गुन्हेगारीमध्ये झालेले बदल तसेच इलेक्ट्रॉनिक पुरावे याचा समावेश नव्हता. गुन्हेगारीमध्ये दिवसेंदिवस बदल होत आहेत. या तीन कायद्यात केलेल्या परिवर्तनामुळे इलेक्ट्रॉनिक डिजिटल पुरावे ग्राह्य मानण्यात आले आहेत. यामुळे आरोप सिद्ध होण्यास मदत होणार आहे. डिजिटल पुरावे कुणीही बदलू शकत नाही. भारतीय साक्ष संहितेत याचा समावेश झाल्याने अपराधिक न्याय प्रणालीमध्ये गतिशिलता येऊन अपराध्यांना शिक्षा होण्याचे प्रमाण वाढीस लागेल.

पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी महाराष्ट्र पोलीस दल अधिक प्रभावी आणि सक्षम करण्यासाठी करण्यात घेतलेले निर्णय, उपक्रम याविषयी सविस्तर माहिती दिली. प्रास्ताविकात नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी मध्यवर्ती पुरावा व्यवस्थापन कक्षाची संकल्पना विषद केली.

या कार्यक्रमास भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, माजी महापौर कविता चौतमोल, माजी नगरसेवक हरेश केणी, अजय बहिरा, राजू शर्मा, मुकित काझी, प्रभाकर बहिरा, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी, माजी नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर, नीता माळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चिटणीस ब्रिजेश पटेल, तालुका उपाध्यक्ष राजेंद्र पाटील, भूपेंद्र पाटील, अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा शहर अध्यक्ष सुमित झुंझारराव, वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## श्रीवर्धन येथील श्रीमंत पेशवे स्मारकाचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते भूमिपूजन

खासदार सुनील तटकरे म्हणाले की, देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांना विनंती केली होती. त्यावर त्यांनी बैठक लावून स्मारकास तत्वता मान्यता दिली होती. त्या कालावधीत लक्ष्मी नारायण देवस्थान ट्रस्ट यांच्या मनात गैरसमज होते, परंतु आज मंत्री आदिती तटकरे हिच्या पुढाकारातून श्रीमंत पेशवे यांचे नेत्रदीपक स्मारक उभे राहतंय हे श्रीवर्धनच्या वैभवात भर घालेल.

## माथेरानमध्ये नव्याने दाखल होणाऱ्या ई-रिक्षा हातरिक्षाचालकांना मिळतील -आमदार प्रशांत ठाकूर

या कार्यक्रमाचे आयोजन भाजप माथेरान शहर महिला मोर्चाने केले होते. त्यात माजी नगरसेविका प्रतिभा घावरे, प्रियांका कदम, सुहासिनी शिंदे, संध्या शेलार, जयश्री कदम, जयश्री मालुसरे यांनी सहकाऱ्यांसह पुढाकार घेतला. या वेळी माथेरानमधील सह्याद्री रेस्क्यू टीम आणि आबदा टीम यांना भाजप माथेरानकडून चार लाख रुपयांचे साहित्य भेट देण्यात आले. आबदा टीमचे दिनेश सुतार तसेच माथेरानचे सहायक पोलीस निरीक्षक अनिल सोनोने यांनी हे साहित्य आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते स्वीकारले.

# पनवेलमध्ये महिलांसाठी विविध कार्यक्रम

## वडाळे तलाव येथे बाईक रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून इनरव्हील क्लब ऑफ न्यू पनवेल, वीर व्हुमन फाउंडेशन पनवेल, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने शहरातील प्रसिद्ध वडाळे तलाव येथे बाईक रॅलीसह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. या वेळी बाईक रॅलीसह विविध कार्यक्रमाचे आयोजन करून महिलांचा सन्मान करण्यात आला. याचबरोबर हेल्थ कार्डचे मार्गदर्शन, बक्षीस वितरण, लकी ड्रॉ असे विविध कार्यक्रम झाले. या सर्व कार्यक्रमांना पाठिंबा देण्यास उत्सुक असलेल्या महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला.

या वेळी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, पनवेल महापालिका उपायुक्त वैभव विधाते, भाजप महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य सिद्धार्थ बांठिया, माजी महापौर कविता चौतमोल, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, सुहासिनी केकाणे, वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, आदेश परेश ठाकूर, रूपेश नागवेकर, शिल्पा राजपूत, आर्थिक सल्लागार संतोष सिंग यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य नवनीत पटेल ज्वेलर्स, व्हीडीआयपीएल भाग्यश्री देशमुख, सृष्टी फूड्स क्षितिजा भिसे, पॅनेसिया हॉस्पिटल सुभाष सिंग, द बेकर्स कंपनी प्रीती वेदक यांचे लाभले.











# आमदार महेश बालदींच्या प्रयत्नातून पारगाव येथे सामाजिक सभागृह

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते उद्घाटन



(छाया : योगेश पाटील)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्न आणि पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे पूर्ण होत आहे. याअंतर्गत पारगाव गावातील खालची आळी येथे सामाजिक सभागृह बांधण्यात आले आहे. आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून जिल्हा नियोजन या निधीतून करण्यात आले आहे.

या सभागृहाचे उद्घाटन भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते रविवारी (दि. १०) करण्यात आले. या वेळी ज्येष्ठ नेते एन. जी. तारेकर, तंटामुक्ती अध्यक्ष सदाशिव पाटील, गाव अध्यक्ष बबन तारेकर, ज्येष्ठ नेते गजानन म्हात्रे, ओवले सरपंच रूपेश गायकवाड, माजी सरपंच शंकर म्हात्रे, माजी सरपंच अहिल्या नाईक, माजी सरपंच सुभाष म्हात्रे, माजी उपसरपंच गजानन पाटील, माजी सरपंच महेंद्र पाटील, ज्येष्ठ नेते उदय पाटील गुरुजी, ज्येष्ठ नेते रमण तांडेल ग्रामसेवक मोरेश्वर मोकल, माजी उपसरपंच सुशीलकांत तारेकर, कन्हैया पाटील, निशा पाटील, मनोज दळवी, विश्वनाथ गायकवाड, सदस्य कल्पना तारेकर आदी उपस्थित होते.



# कंटेनर आणि टेम्पोच्या अपघातात चालक जखमी

**पनवेल : वार्ताहर**

जेएनपीटी हायवेकडे जाणाऱ्या रस्त्यावर कॉलेज फाटा पनवेलजवळ टेम्पो व कंटेनरमध्ये अपघात झाला. यात टेम्पोचालक जखमी झाला. पनवेलच्या दिशेने एक टेम्पो पाण्याचे जार घेऊन जात होते.

या वेळी तो जेएनपीटी – पनवेलकडे जाणाऱ्या रस्त्यावरून कॉलेज फाट्याजवळ आला असता चालक पतीराम सरोज याचे नियंत्रण सुटले आणि टेम्पो उरणकडे जाणाऱ्या विरुद्ध मार्गिकेवर आला आणि कंटेनरला धडकला. यात टेम्पोचे मोठे नुकसान झाले आहे.

या अपघातात चालक जखमी झाला आहे. अपघातात कंटेनरचेदेखील मोठे नुकसान झाले आहे. या कंटेनरमध्ये २२ टन केळी होती. ही केळी घेऊन कंटेनर जेएनपीटीकडे जात होता. अपघाताची माहिती मिळताच वाहतूक पोलीस व पनवेल शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. सुदैवाने या अपघातात जीवितहानी नाही.



**पनवेल :** येथील नागरिकांना अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिरात जाता यावे यासाठी पनवेल ते अयोध्या ट्रेन सुरू करण्यात यावी, अशी मागणी भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे कळंबोली मंडल अध्यक्ष केशव जाधव यांनी केली आहे. या संदर्भात त्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांना निवेदन दिले. या वेळी भाजप कळंबोली मंडल अध्यक्ष रविनाथ पाटील, उत्तर भारतीय मोर्चा जिल्हा सरचिटणीस राजेश पांडे, साऊथ सेलचे प्रदेश उपाध्यक्ष रमेश नायर आदी उपस्थित होते.



दिवेआगर (श्रीवर्धन) येथे रविवारी झालेल्या कृषी मेळाव्यानिमित्ताने उरणच्या नागाव येथील प्रकाश शांताराम ठाकूर यांना वसंतराव नाईक कृषी भूषण पुरस्कार प्राप्त झाला. याबद्दल त्यांचे राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे, खासदार सुनील तटकरे यांनी अभिनंदन केले. मंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, कृषी विद्यापीठचे कुलगुरू आदींच्या उपस्थितीत हा सोहळा झाला.



## संपादकीय

# विरोधकांमध्ये खदखद

भारतातील सर्वांत मोठ्या लोकसभा निवडणुकीसाठी सत्ताधारी भारतीय जनता पक्षाने तब्बल १९५ उमेदवारांची पहिली यादी जाहीर करून रणसंग्रामात आघाडी घेतली असताना दुसरीकडे विरोधी पक्ष आणि त्यांच्या आघाड्यांमध्ये अजूनही तू तू मैं मैं सुरू आहे. देश पातळीवरील इंडिया आघाडीतून बाहेर पडत तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालमधील सर्व ४२ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले आहेत. इकडे महाराष्ट्रातील महाविकास आघाडीतही खदखद दिसून येत आहे.

**निवडणूक म्हटली की तयारी ही आलीच. खरंतर निवडणूक म्हणजे एक प्रकारची लढाईच असते. त्यासाठी पूर्ण ताकदीने सज्ज व्हावे लागते. विशेषत: आधी दोनदा जेव्हा पराभव पाहिला असेल तेव्हा तर सर्वशक्तीनिशी मैदानावर उतरणे क्रमप्राप्त असते, मात्र मोदी लाटेत विरोधक एवढे गलितगात्र झाले आहेत की त्यांना काही सुचेनासे झाले आहे. नरेंद्र मोदी हे देशाचा उत्तुंग विकास व प्रगतीच्या जोरावर पंतप्रधानपदाची हॅट्ट्रिक साधण्यासाठी सज्ज झाले आहेत. त्यांच्यापुढे आपला एकट्याने निभाव लागणार नाही हे ओळखून काँग्रेसने मिळले त्या पक्षाला सोबत घेऊन इंडिया आघाडी बनविण्याचा घाट घातला. इंडिया नाव दिल्याने चमत्कार होईल असे काँग्रेसला वाटले, पण कर्तृत्वाविना काही मिळण्याचा जमाना गेला. काँग्रेसचे दुर्दैव म्हणजे सुरुवातीला इंडिया आघाडीत सहभागी झालेले पक्ष हळूहळू आपापले साम्राज्य जपत आघाडीतून फारकत घेताना पहावयास मिळत आहे. यातील एक म्हणजे पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री सर्वेसर्वा असलेला तृणमूल काँग्रेस पक्ष. गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस आणि तृणमूल काँग्रेस यांच्यात जागावाटपावर चर्चा चालू होती. काँग्रेसला तृणमूल पक्ष अवघ्या दोन जागा देण्यास तयार होता, तर काँग्रेसला आणखी जागा हव्या होत्या. जागावाटपावर कोणताही ठोस तोडगा निघत नसल्यामुळे ममता बॅनर्जी यांनी काही दिवसांपूर्वी आम्ही लोकसभेची निवडणूक स्वबळावर लढवणार आहोत, अशी घोषणा केली होती. त्यानंतर संयमाची भूमिका घेत काँग्रेसने तृणमूलशी चर्चा करण्याचा प्रयत्न केला, मात्र या चर्चेतून कोणताही ठोस निष्कर्ष निघत नसल्यामुळे आता शेवटी तृणमूल काँग्रेसने पश्चिम बंगालच्या सर्व ४२ जागांवर आपले उमेदवार जाहीर केले आहेत. त्यामुळे पश्चिम बंगालमध्ये इंडिया आघाडी संपुष्टात आली आहे. दुसरीकडे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल प्रमुख असलेला आम आदमी पक्षही स्वतंत्रपणे लढण्याच्या तयारीत आहे. इकडे महाराष्ट्रातदेखील विरोधकांच्या आघाडीत आलबेल नाही. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या महविकास आघाडीतील समावेशावरून खटके उडत आहेत. आघाडीतील प्रमुख नेते ठोस काही सांगत नसल्याने आंबेडकर वैतागले असून ते काँग्रेसवर हल्लाबोल करीत आहेत. महाविकास आघाडीतील जागावाटप निश्चित व्हायचे बाकी असताना याच आघाडीतील ठाकरे गटाचे कोकणचे नेते आमदार भास्कर जाधव यांनी पक्षांतर्गत आपली निराशा जाहीरपणे बोलून दाखवली आहे. ज्या वेळेला आमचा पक्ष फुटला त्या वेळेला पक्षाने मला गटनेता केले नाही, पद दिले नाही म्हणत जाधव यांनी नाराजी व्यक्त केली. अशा प्रकारे समोर एवढे मोठे आव्हान असताना विरोधी आघाड्या आणि पक्षांमध्येच घुसमट दिसते. यांचे आपापसात काही जमून येत नाही, मग हे निवडणुका काय लढणार, अशी चर्चा जनतेत आहे. नवभारताचे निर्माते पंतप्रधान मोदी हेच भारताला विकसित देश बनवू शकतील आणि म्हणूनच त्यांना साथ देण्याचा निर्णय पुन्हा एकदा जनतेने केला आहे.**

# स्थलांतरित व स्थानिक पक्ष्यांची रेलचेल, निरीक्षणाला बहर



**खबरबात**
**धम्मशील सावंत**

समृद्ध जंगल, विविध भूभाग, पाणथळ क्षेत्र, २४० किमीचा विस्तृत सागरी किनारा व निसर्ग सौंदर्याने बहरलेल्या रायगड जिल्ह्यात पक्षांच्या जवळपास ३५० प्रजाती सापडतात. सध्या जिल्ह्यात स्थलांतरित व स्थानिक पक्ष्यांची रेलचेल पहायला मिळत आहे. त्यामुळे पक्षी निरीक्षक व अभ्यासक सुखावले आहेत.

नुकतेच अलिबाग तालुक्यातील सारळ खाडीकिनारी रेड नॉट या दुर्मिळ पक्ष्याचे दर्शन झाले. ही नोंद महाराष्ट्रातील तिसरी व जिल्ह्यातील पहिली नोंद आहे. म्हणजेच आतापर्यंत महाराष्ट्रात हा पक्षी तिसऱ्यांदा दिसला आहे. असे बहराई फाऊंडेशनचे पक्षी अभ्यासक वैभव पाटील यांनी सांगितले.

नोव्हेंबर ते मार्च हा काळ पक्षी निरीक्षणासाठी पर्वणी समजला जातो. सध्या थंडी देखील चांगली आहे. त्यामुळे अनेक स्थलांतरित व स्थानिक पक्षी मनमुराद बागडत आहेत. काही दिवसांनी स्थलांतरित पक्षी परतीच्या मार्गाला लागतील, तर काहींचे स्थलांतर सुरू आहे. या पक्षांना पाहण्यासाठी व अभ्यासण्यासाठी येथील पक्षी निरीक्षण क्षेत्र गजबजली आहेत. पक्षांसह पक्षी निरीक्षक व अभ्यासकांसाठी ही क्षेत्र हॉटस्पॉट ठरत आहेत.

सर्वसामान्यांनादेखील या रंगीबेरंगी पक्षांना पाहून तसेच त्यांचा किलबिलाट ऐकून आनंद होताना दिसत आहे. पक्षी निरीक्षणासाठी हॉटस्पॉट असलेली जिल्ह्यातील उत्तम ठिकाणे ही आहेत. अलिबाग, मुरुड, उरण व पनवेल येथील समुद्र, खाडी किनारे, कांदळवने पाणथळ जागा, कर्नाळा पक्षी अभयारण्य, मुरुड येथील फणसाड अभयारण्य, माणगाव, श्रीवर्धन, महाड, म्हसळा आदी ठिकाणे आहेत. अनेक देश-विदेशातील स्थलांतरित पक्ष्यांसाठी येथे सध्या उत्तम हवामान व वातावरण आहे. तसेच मुबलक खाद्य देखील मिळते. परिणामी परदेशी व स्थलांतरित पक्षी मोठ्या प्रमाणावर आले आहेत. अलिबाग येथील आक्षी आणि रेवस येथील समुद्रकिनारा खाडी प्रदेश ६०हून अधिक स्थलांतरित पक्ष्यांसाठी प्रसिद्ध आहे. राम धरणेश्वर येथे ३०हून अधिक गरुड वर्गीय शिकारी पक्षी आढळतात. एकाच ठिकाणी इतक्या प्रजाती आढळणारे हे एकमेव ठिकाण आहे. सागरगड, सिद्धेश्वर, कनकेश्वर येथे अनेक प्रकारच्या वृक्ष प्रजाती व पक्षांसाठी उत्तम अधिवास आहे. श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव-पाटणूस येथे पांढऱ्या पाठीची व इतर प्रकारची गिधाडे आणि इतर पक्षांसाठी उत्तम ठिकाण आहे. मुरुड येथील फणसाड अभयारण्य येथे १९० प्रकारचे पक्षी आढळतात. महाड, माणगाव, पाली, सुधागड, कर्जत व माथेरान समुद्र पक्षी वगळून इतर पक्ष्यांसाठी प्रसिद्ध आहे, तर स्थलांतरित तिबोटी खंड्या संपूर्ण जिल्ह्यात आढळतो. नुकतेच पाटणुस येथील पक्षी निरीक्षक राम मुंडे यांनी पाटणूस जंगल भागांमध्ये दोन गिधाड्यांच्या घरट्यामध्ये अंडी पाहिली आहेत. त्यामुळे लवकरच या अंड्यातून पिल्ले बाहेर येतील. यामुळे येथे पक्षी क्षेत्र बहरत आहे.

पश्चिम घाटाचा बराचसा भाग हा रायगड जिल्ह्यातून जातो. दमट हवामान, पानगळीची जंगले पक्षांसाठी विविध अधिवास, गवताळ प्रदेश, पाणथळ जागा, समुद्र आणि खाडीकिनारी असलेली कांदळवने, सदाहरित, निमसदाहरित व पानगळीची जंगले असे समृद्ध वातावरण व अधिवास पक्ष्यांच्या वाढ व विकासासाठी लाभदायक आहेत. त्यामुळेच जिल्ह्यात विविध प्रकारचे असंख्य पक्षी राहत आहेत असे पक्षी निरीक्षक प्रवीण कवळे यांनी सांगितले

### दुर्मिळ प्रजातीचे दर्शन

येथे दुर्मिळ प्रजातीच्या विविध पक्ष्यांचे दर्शन देखील होते. त्यामध्ये थोरला धनेश, मलबारी धनेश, राखी धनेश, मलबारी करडा धनेश यांचा समावेश आहे तसेच दुर्मिळ पांढऱ्या पाठीची गिधाडे व भारतीय गिधाडे येथे आहेत. या पक्ष्यांबरोबर आणखी विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे रायगड जिल्ह्यात महाराष्ट्राचा राज्य पक्षी हरियालदेखील सर्वत्र आढळतो. सिस्केप संस्थेचे गिधाड संवर्धन काम येथे प्रभावीपणे सुरू आहे.

### देशी व विदेशी स्थलांतरित पक्षी

हजारो किलोमीटरचा प्रवास करून विविध देशी व विदेशी स्थलांतरित पक्षी रायगड जिल्ह्यात दाखल होतात. अमूर ससाणा याबरोबरच ऑर्च बिल्लीयड फ्लायकॅचर, ठिपकेवाली तुतारी, काळ्या डोक्याचे भारीट, तिबोटी खंड्या, फ्लेमिंगो व हिमालयन बुलबुल व इतरही देशी व विदेशी प्रवाशी व स्थलांतरित पक्षी जिल्ह्यातील विविध भागात दाखल होतात. विशेष म्हणजे औद्योगिकी कारणामध्येदेखील येथील जैवविविधता टिकून आहे, असे पक्षी अभ्यासक राम मुंडे म्हणाले.

### रेड नॉट पक्ष्याचे पहिल्यांदा दर्शन

अलिबाग तालुक्यातील सारळ समुद्रकिनारी रेड नोट (लाल जलरंक) या दुर्मिळ पक्षाचे पक्षी अभ्यासक वैभव पाटील यांना नुकतेच दर्शन झाले असून तशी नोंद वैभव पाटील यांनी केली. त्यामुळे रायगड जिल्ह्यात एका नवीन पक्ष्याची भर पडली आहे. अलिबाग येथील पक्षी निरीक्षक प्रवीण कवळे यांनादेखील रेवस खाडीकिनारी हा पक्षी काही दिवसांपूर्वी दिसला आहे.

रेड नॉट याचे शास्त्रीय नाव कॅलिड्रीस कॅनट्स असे आहे. हा २५ सेमी आकाराचा लहान पक्षी आहे. त्याचे वजन १०० ते २०० ग्रॅम एवढेच असते स्थलांतरादरम्यान हे मोठ्या थाव्यामध्ये दिसून येतात. या थव्यामध्ये एकाच वेळी दहा ते वीस हजार रेड नॉट पक्षी असण्याची शक्यता असते. सर्वांत लांब स्थलांतर करणाऱ्या पक्षांच्या यादीत रेड नॉट पक्षाचा समावेश होतो. साधारण हे पक्षी कमीत कमी दहा हजार किलोमीटर पर्यंत स्थलांतर करतात. हा पक्षी उत्तर अमेरिकेत विण करतो, तर दक्षिण अमेरिका आणि आफ्रिकेमध्ये हिवाळी स्थलांतर करतो तसेच आर्क्टिकमध्येही या पक्षाची विण होते आणि ऑस्ट्रेलियामध्ये ते हिवाळी स्थलांतरासाठी जातात, असे पक्षी अभ्यासक वैभव पाटील यांनी सांगितले.

पक्षी निरीक्षक प्रवीण कवळे म्हणाले की, जिल्ह्यात जवळपास २९ प्रकारचे पक्षी पश्चिम घाटात प्रदेशनिष्ठ आहेत. उदाहरणार्थ मलबारी व राखी धनेश, निलगिरी रानपारवा, करड्या डोक्याची मैना, पांढऱ्या गालाचा कुटूरगा आदी. भविष्यात हा अनमोल ठेवा असाच समृद्ध ठेवायचा असेल, तर त्याचे संवर्धन व जतन करण्याची गरज आहे, तर कांदळवन वनक्षेत्रपाल (अलिबाग) समीर शिंदे यांनी म्हटलेय की, पश्चिम घाट निसर्ग, समृद्ध पाणथळ क्षेत्र व जैवविविधतेने रायगड जिल्हा नटलेले आहे. शिवाय कांदळवने विपुल व समृद्ध आहेत. त्यामुळे येथे देशी विदेशी पक्षांना अनुकूल अधिवास मिळत आहे. याबरोबरच वनविभाग तसेच निसर्गप्रेमी संस्था, पक्षी निरीक्षक व अभ्यासक यांच्यामुळे पक्षांचा अमूल्य ठेवा टिकून आहे.



## बदलते तंत्रज्ञान

# इन्स्टाग्रामने लाँच केले दोन नवे चॅट फीचर्स

सोशल मीडियातील फोटो आणि व्हिडिओ-शेअरिंग प्लॅटफॉर्म इन्स्टाग्राम जगभरात लोकप्रिय आहे.



आपल्या यूजर्ससाठी मेटा या प्लॅटफॉर्मवर कित्येक नवीन फीचर्स देत असते. इन्स्टाग्रामने आता चॅटिंगसाठी दोन नवीन फीचर्स दिले आहेत. यूजर्सना आता व्हॉट्सअ‍ॅपप्रमाणे इन्स्टाग्रामचे मेसेजही एडिट करता येणार आहेत.

इन्स्टाग्रामने आपल्या एक्स हँडलवरुन याबाबत माहिती दिली आहे. या वर्षाचे दोन महिने कमी झाले आहेत, मात्र इन्स्टाग्राममध्ये दोन नवे फीचर्स जोडले गेले आहेत, अशा आशयाची पोस्ट इन्स्टाग्रामने केली आहे. मेसेज एडिट करण्यासोबतच, चॅट्स पिन करण्याची सुविधाही इन्स्टा देणार आहे. यूजर्सना आता चुकीचा मेसेज एडिट करता येणार आहे. यासाठी १५ मिनिटांचा वेळ मिळणार आहे. मेसेज पाठवून १५ मिनिटांपेक्षा अधिक वेळ झाला असेल, तर तो एडिट करता येणार नाही. यासोबतच यूजर्सना आपले फेव्हरेट किंवा महत्त्वाचे तीन चॅट्स मपिनफ करता येणार आहेत. यामुळे हे तीन चॅट्स कायम सर्वांत वरती राहतील, आणि तुमचे महत्त्वाचे मेसेज मिस होणार नाहीत.


हे दोन्ही फीचर्स व्हॉट्सअ‍ॅपवर आधीपासूनच उपलब्ध आहेत. आता इन्स्टावरदेखील हे फीचर्स लाँच करण्यात आले आहेत. यासोबतच व्हॉट्सअ‍ॅपवर असणारे टर्न ऑफ रीड रिसिप्ट्स, सेव्ह फेव्हरेट स्टिकर्स, रिप्लाय टेक्स्ट विथ GIF, फोटो किंवा व्हिडिओ असे फीचर्सही इन्स्टाग्रामवर देण्यात आले आहेत. यामुळे इन्स्टावर चॅटिंगची मजा आणखी वाढणार आहे.

एखादा मेसेज एडिट करण्यासाठी तुम्हाला त्या मेसेजवर लाँग प्रेस करावे लागेल. यानंतर एक मेन्यू ओपन होईल, ज्यामध्ये Edit Message हा पर्याय उपलब्ध असेल. एखादं चॅट पिन करण्यासाठी तुम्हाला मेसेजेसमध्ये जावं लागेल, यानंतर जे चॅट तुम्हाला पिन करायचं आहे, त्यावर लेफ्ट स्वाईप करा. यानंतर झळप हा पर्याय निवडा. याच पद्धतीने तुम्ही पिन केलेलं चॅट अनपिनदेखील करू शकाल. तुम्ही या पद्धतीने तीन ग्रुप किंवा पर्सनल चॅट्स पिन करू शकता.

इन्स्टाग्राम हे मेटा कंपनीचे फिचर आहे. ज्या प्रमाणे कंपनी व्हॉट्सअ‍ॅपसाठी सतत काही ना काही नवीन देत असते तसेच इन्स्टाग्राम सेवाही सुधारत आहे.

# भारतीय क्रिकेटपटू विजय हजारे

## निमित्त



विजय हजारे यांचा जन्म मराठी कुटुंबात ११ मार्च १९१५ रोजी झाला. हजारे यांचे क्रिकेटमध्ये आगमन होत असताना, त्यांना हिंदू जिमखान्याकडून क्रिकेट खेळण्यासाठी प्रस्ताव आला होता. सुरुवातीस त्यांनी तो प्रस्ताव नाकारला, पण त्यावेळचे क्रिकेट मंडळाचे अध्यक्ष डी' मेलो यांनी त्यांची समजूत काढली आणि हजारे प्रथमश्रेणी क्रिकेट खेळले.

हजारे हे उजव्या हाताने फलंदाजी आणि उजव्या हाताने मध्यमगती गोलंदाजी करीत असत. प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये २३८ सामने ते खेळले. यामध्ये त्यांनी ५८.३८च्या सरासरीने १८,७४० धावांचा पाऊस पाडला. या प्रथमश्रेणी क्रिकेटमधील हा भारतीय धावांचा विक्रम प्रथम सुनील गावसकर आणि नंतर सचिन तेंडुलकर यांनी मोडला. प्रथमश्रेणीत त्रिशतक करणारे हजारे हे पहिले भारतीय होते. त्यांनी 'द हिंदूज' विरुद्ध १९४३-१९४४मध्ये ३०९ धावा ठोकल्या होत्या. यामध्ये त्यांची सर्वोच्च धावसंख्या नाबाद ३१६ आहे. अशाप्रकारे त्यांनी प्रथमश्रेणी सामन्यात दोन त्रिशतके झळकावली.

प्रथमश्रेणीत ६० शतके आणि सलग तीन कसोटींमध्ये शतक नोंदवणारे ते पहिले भारतीय होते. त्यांनी गुल मोहंमद यांच्यासमवेत १९४७मध्ये ५७७ धावांची भागीदारी केली होती. ती भागीदारी २००६मध्ये श्रीलंकेच्या कुमार संघकारा आणि महेला जयवर्धने यांनी साउथ आफ्रिकेविरुद्ध ६२४ धावा करून मोडली. कसोटी क्रिकेट खेळत असताना विजय हजारे यांनी ३० कसोटींमध्ये ४७.६५ च्या सरासरीने २१९२ धावा केल्या. यामध्ये त्यांची नाबाद १६४ ही सर्वोच्च धावसंख्या आहे. कसोटीमध्ये गोलंदाजी करताना त्यांनी ६१ च्या सरासरीने २० बळी घेतले. यामध्ये त्यांची ४/२९ ही सर्वोत्तम गोलंदाजी आहे.

कर्णधार नसताना हजारे यांनी अनेक प्रशंसनीय खेळ्या केल्या. यामध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यात १९४७-४८मध्ये एडिलेड कसोटीत दोन्ही डावात झळकावलेल्या शतकांचा समावेश आहे. १९५१मध्ये इंग्लंडविरुद्धच्या मायदेशातील मालिकेसाठी हजारेंकडे कर्णधारपद सोपवण्यात आले. त्यांनी दिल्लीतील पहिल्या कसोटी सामन्यामध्ये नाबाद १६४ धावांची दमदार खेळी केली. ही धावसंख्या त्यावेळी भारताकडून नोंदवलेली सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या होती. भारतीय क्रिकेटमधील अनेक विक्रमांचे प्रणेते असलेल्या हजारेंनी कर्णधार म्हणून पहिल्याच कसोटीत शतक झळकावण्याचा मानही पहिल्यांदा मिळवला. विजय हजारे यांच्याच नेतृत्वाखाली भारताने पहिला कसोटी विजय मिळवला.

हजारे हे मितभाषी असल्यामुळे, भारताने पहिला कसोटी विजय मिळवल्यानंतरही ते आपल्या सहकारी खेळाडूंना फक्त 'शाब्बास' म्हणाले. सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर यांच्या पूर्वी भारतीय क्रिकेटमध्ये अनेक विक्रम करणारे हजारे हे पहिले भारतीय होते. त्यामुळे त्यांना आद्य भारतीय विक्रमादित्य असेच म्हणावे लागेल. पद्मश्री किताब मिळवणारे पहिले भारतीय क्रिकेट खेळाडू विजय हजारे यांची इनिंग कर्करोगाच्या दीर्घ आजारानंतर १८ डिसेंबर २००४ रोजी वडोदरा येथे संपली.

(साभार : इंटरनेट)

## क्लिक...क्लिक...!



**सिंधुदुर्ग : हवामानात सातत्याने बदल होत असताना याचा परिणाम विविध व्यवसायांवर होताना दिसून येत आहे. तीव्र उन्हामुळे देवगड येथील बंदरात दुपारच्या सुमारास बोटी शाकारून ठेवण्यात आल्या असल्याचे सायली रावले-वैद्य यांनी टिपलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# 'ही' हिरवीगार भाजी महिलांसाठी फायदेशीर

आपल्या आरोग्यासाठी हिरव्यागार भाजी या नेहमीच फायदेशीर ठरतात. कोणत्याही प्रकारचे आजार दूर ठेवण्यासाठी आहारात भाजी असणे आवश्यक आहे. यामध्ये वाल अथवा पावटा ही एक अशी भाजी आहे जी विशेषतः महिलांच्या आरोग्यासाठी उत्तम ठरते. याचे आरोग्यदायी फायदे जाणून घ्या.



बाकलाची भाजी अर्थात फावा बीन्समध्ये प्रोटीन, फायटो न्यूट्रिएंट्स, कॉपर, अमिनो ॲसिड, विटामिन बी, फायबर आणि मॅग्नेशियम असे अनेक पोषक तत्व आढळतात. शरीराला आवश्यक मिनरल्स देण्याचे काम ही भाजी करते. काही जण यांच्या पानांची भाजीदेखील करतात. रिजेन्सी हॉस्पिटल लखनौमधील डाएटिशियन रितु त्रिवेदी यांनी ही भाजी खाण्याचे फायदे सांगितले आहेत, जाणून घ्या.

गरोदरपणात होतो फायदा : बाकलाची भाजी अर्थात फावा बीन्सचे सेवन गरोदर असणाऱ्या महिलांसाठी अत्यंत फायदेशीर मानले जाते. यामध्ये कॅल्शियम, लोह आणि मॅग्नेशियम अधिक प्रमाणात असून गरोदर महिलांसाठी उपयोगी ठरते. यामध्ये फोलेट असून बाळाच्या मानसिक विकासासाठी आणि हाडांचा चांगला विकास होण्यासाठी याचा फायदा मिळतो.

ॲनिमियापासून बचाव : फावा बीन्सच्या नियमित सेवनामुळे शरीरातील रक्ताची कमतरता कमी होते आणि ॲनिमियाची लक्षणे कमी होतात. वास्तविक यामध्ये लोहाचे प्रमाण अधिक प्रमाणात असल्यामुळे शरीरामध्ये हिमोग्लोबिनचा स्तर वाढण्यास मदत मिळते. याच्या नियमित सेवनाने शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते.

ब्रेस्ट कॅन्सरपासून ठेवते दूर : डाएटिशियननुसार, पावट्याचे दाण्यांमध्ये कॅन्सरशी लढणारे पोषक तत्व आढळतात. याच्या सेवनामुळे महिलांचा ब्रेस्ट कॅन्सरपासून बचाव करणे अधिक सोपे होते. फावा बीन्समध्ये जास्त प्रमाणात विटामिन बी आणि विटामिन डी आढळतात, जे ब्रेस्ट कॅन्सरशी लढण्यास मदत करतात.

साखर नियंत्रणात आणण्यास मदत : हेल्थलाईनने दिलेल्या अहवालानुसार, फावा बीन्स खाल्ल्याने साखर रक्तात वाढण्याचा धोका कमी होतो कारण यामध्ये अधिक प्रमाणात अँटीडायबिटीक गुण असतात. तसंच फावा बीन्समध्ये विसिने आणि डिविसीन नावाचे घटक याला अँटीडायबिटीक बनवते. या भाजीच्या नियमित सेवनाने डायबिटीस रुग्णांना फायदा मिळतो.

# महिलांसाठी विविध उपक्रम उत्साहात

## बाईक रॅलीद्वारे नारीशक्तीचे दर्शन



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या वतीने लेडीज बाईक रॅली २०२४चे आयोजन केले होते.

या बाईक रॅलीमध्ये एकूण ८० हून अधिक महिलांनी सहभाग घेतला. वासांबे ग्रामपंचायत सरपंच उमा मुंढे व क्लबच्या अध्यक्षा रेश्मा सुनील कुरूप यांच्या हस्ते रॅलीचा फ्लॅग ऑफ करण्यात आले. मोहोपाडा अचानक मैदानापासून दांडफाटा अशी ही रॅली निघाली आणि रीस येथील अपूर्व हॉटेलमध्ये परतली. सर्व सहभागींना रोटरी क्लब ऑफ पाताळगंगातर्फे सहभाग प्रमाणपत्र देण्यात आले. स्नॅक्सचे प्रायोजक संजोग वाघेरे पाटील व प्रितीताई कडव यांच्या मदतीने करण्यात आले

या रॅलीमध्ये रोटरीयन सुनील कुरूप, सुशांत उचिल, आयपीपी अमित शहा, शानभाग सर, गणेश काळे, डॉ. मिलिंद भगत, गणेश म्हात्रे, रमाकांत जी कोरडे. उमा मुंढे, शारदा काळे, मेघाताई कोरडे, रुतुजा भोसले, प्रतीक्षा कुरंगळे, वर्षाताई पाटील, डॉ. लेखा उचील, अन मित्तल शहा, जयश्री पाटील, डॉ. शीतल भगत, अनुराधा होनावळे भगिनी, मेन्से मॅडम, अननेट भक्ती आणि स्नेहल कोरडे उपस्थित होते. अध्यक्षा रेश्मा कुरूप यांनी सरपंच उमा मुंढे व संदिप मुंढे ह्यांचे बाईक रॅलीच्या समारोप समारंभासाठी जागा दिल्याबद्दल आभार मानले.

## वकील, डॉक्टर महिलांचा सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेस आणि सुधाकर घारे प्रतिष्ठानच्या वतीने वकील व डॉक्टर महिलांचा सन्मान सोहळ्याचे आयोजन राष्ट्रवादी काँग्रेसच्या जन संपर्क कार्यालयातील सभागृहात करण्यात आले होते.

या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला तालुकाध्यक्ष ॲड. रंजना धुळे, कर्जत खालापूर विधानसभा मतदार संघाच्या महिलाध्यक्षा ॲड. पूजा सुर्वे, महिला शहराध्यक्ष मधुरा चंदन, तालुका युवती अध्यक्षा युक्ता भोपतराव, नगरसेविका भारती पालकर, डॉक्टर सेल जिल्हाध्यक्षा फिझा तांबोळी, सुचिता लोहकरे, स्वाती कुमार, राजश्री कोकाटे आदी व्यासपीठावर उपस्थित होत्या. ॲड. रंजना धुळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर ॲड. कोमल ऐनकर, ॲड. क्रांती अभंगे, ॲड. कल्पना पाटील, ॲड. प्रीती तिवारी यांनी मनोगते व्यक्त केली.

५० महिला डॉक्टर व ६४ महिला वकील यांचा सन्मानपत्र व तुळशीचे रोप देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये जेष्ठ महिला वकील सुवर्णा चंदन, नंदिनी कदम, डॉ. प्रमिला ओसवाल आदींचा सहभाग होता. सूत्रसंचालन समीर सोमणे तर आभार प्रदर्शन मधुरा चंदन यांनी केले.



## कर्जत अभियांत्रिकी कॉलेजमध्ये रक्तदान शिबिर



**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना व मेकेनिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन च्यावतीने समर्पण रक्तपेढी घाटकोपर – मुंबई यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ८० रक्तदात्यांनीं रक्तदान केले. सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांनी आयोजित केलेले हे ४९२ वे रक्तदान शिबिर होते.

रक्तदान शिबिराचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास पिलेवान यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी, डॉ. फातेमा कर्जतवाला प्रा. दीपाली केसकर, प्रा. शब्बीर कर्जतवाला, डॉ. ए.जी. नागपुरे, प्रा. प्रवीण देशपांडे आदी उपस्थित होते. मंगेश वझरेकर,अनिल घरत, वाहिद शेख, तुषार मुंडे व प्रा. विकास पाटील यांनी एकाच वेळी रक्तदान करून रक्तदानाची सुरुवात केली. रक्तसंकलन घाटकोपर येथील समर्पण रक्त केंद्राच्या डॉक्टर व आरोग्य सेवकांनी केले.

या वेळी विकास चित्ते, प्रा. सोनल पाटील, प्रा. आशुतोष जाधव, प्रा. एस.वी. देशपांडे, प्रा. प्रवीण नेरपागर, प्रा. दिनेश तारे, सिद्धेश दातखिळे, प्रियांका सूर्यवंशी, रोहन भोसले, ऋतिक आव्हाड, हृषिकेश जाधव, विश्वास अल्हाट, धनश्री कोर, आदित्य गायकर, वैभवी भोंडवे,साक्षी बोरसे, चिन्मय निकम, शार्दुल टेमकर, संदीप लाड, आमिर मणियार, बिलाल आढाल, राकेश परमार, भूषण बाफना आदी उपस्थित होते.

## गोळीबार केल्याने गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

भांडण करून बंदुकीने दहशत निर्माण करण्याच्या गोळीबार केल्याप्रकरणी वळके येथील दोंघावर जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून महिला फिर्यादीच्या तक्रारीनुसार रेवदंडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत वृत्त असे की, वळके येथील महिला फिर्यादी सिमा साईनाथ म्हात्रे ही ७ मार्च रोजी दुपारी मुरूड तालुक्यातील वळके नजीकच्या चराटी जंगलभागातून लाकडे तोडून परतत असताना, जंगलभागातील पाउल वाटेवर वळके येथील प्रल्हाद काटकर यांने तिला हटकले व भांडण केले. या वाटेने पुन्हा जाउ नये यासाठी या वेळी दोघांपैकी प्रमोद काटकर यांनी प्रल्हाद काटकर यांच्या हाती छर्याची बंदुक दिली. या बंदुकीच्या धाकाने महिला फिर्यादी पळताना प्रल्हाद काटकर यांनी बंदुकीची गोळी झाडली व दहशत निर्माण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला.

याबाबत फिर्यादीने रेवदंडा पोलीस ठाण्यात तक्रारीनुसार प्रल्हाद काटकर व प्रमोद काटकर यांचेवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरिक्षक श्रीकांत किरवले हे करत आहेत.


## महाराष्ट्र शासन

**महाराष्ट्र शासन कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग, सहकार विद्यामंदिर समोर,
जुना मुंबई पुणे राष्ट्रीयमहामार्ग कळवा, ठाणे– ४००६०५**

ईमेल–eemsddkalwa@yahoo.co.in दुरध्वनीक्र २५३७४७७०–०२२.

**ई–निविदा सूचना क्र–३५ सन २०२३–२४**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडुन खालील कामाकरिता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाइन) ई–निविदा मागवित आहेत ई–निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in संकेतस्थळावरुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई–निविदा व निविदेबाबतसर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.
निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग कळवा ठाणे यांनी राखुन ठेवला आहे अट असलेली. निविदा स्विकारली जाणार नाही.

| | | |
|---|---|---|
| १. | कामाचे नांव | डोळ्वहाल बंधारा, ता. – रोहा, जि. रायगड येथील विविध द्वारांचे सन २०२४–२५ करिता वार्षिक परिचलन व देखभाल कामे. |
| | जिल्हा | रायगड |
| | निविदेची किंमत रुपये | रु.४६,७०,८२३/– |
| २. | कामाचे नांव | सूर्या प्रकल्प–धामणी धरण ता.– विक्रमगड, जि. पालघर येथील सेवाद्वार क्र.१ व २ ची आपात्कालीन दुरुस्ती कामे . |
| | जिल्हा | पालघर |
| | निविदेची किंमत रुपये | रु.६८,९२,६८७/– |

| | | |
|---|---|---|
| ई–निविदा उपलब्ध कालावधी | : | दिनांक ०७/०३/२०२४ ते दिनांक २१/०३/२०२४ |
| Geo-tagging कालावधी | : | दिनांक १४/०३/२०२४ ते दिनांक २०/०३/२०२४ |
| ई–निविदा उघडण्याचा दिनांक | : | दिनांक २२/०३/२०२४ |

जा.क्र.यांभाविवि/लेशा–२/६८१ /सन २०२४
कार्यकारी अभियंता, यांत्रिकी भांडार व विकास विभाग
कळवा–ठाणे यांचे कार्यालय
दिनांक–१/०३/२०२४

सही/–
( स. ना. रोकडे)
कार्यकारी अभियंता,
यांत्रिकी भांडार व विकास विभाग, कळवा – ठाणे



## महाराष्ट्र शासन

**(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड,
जिल्हा रायगड ४०२३०१**

**Email :- rpdmahad.ee@mahapwd.com Ph.No. 02145 222243**

**NOTICE INVITING e-TENDER**

**Notice No. 15 for 2023-24**

कार्यकारी अभियंता, (रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक) मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड, पिन–४०२३०१, दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२२४३ महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे योग्य त्या कंत्राटदारांकडून बी–१ नमुन्यातील निविदा ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, महाड रायगड किल्ला सेल, मार्ग प्रकल्प विभाग , महाड, यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी | ई–निविदा संचाची किंमत | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पाचाड येथे पोलीस अधिकारी कर्मचारीकरीता मुलभुत सोईसुविधा तयार करणे ता. महाड जि. रायगड | ९९१८४७८ | १०००० | ६ महिने | ११८० | वर्ग ४ व वरील |
| २ | सा. बां. विभाग भांडारगृह पाचाड येथे शासकिय अधिकारी कर्मचारीकरीता मुलभुत सोईसुविधा तयार करणे ता. महाड जि. रायगड | ९९१३०१७ | १००००० | ६ महिने | ११८० | वर्ग ४ व वरील |
| ३ | किल्ले रायगडावर ऐतिहासिक थाटणीचे स्टॉल्स बांधणे. | ९७७४२२५ | ९८००० | ६ महिने | ११८० | वर्ग ४ व वरील |
| ४ | किल्ले रायगड येथील पायरी मार्ग चित्त दरवाजा ते नाने दरवाजा पायरी मार्ग मधील टप्यात पर्यटक सुविधा केंद्र उभारणे. | ९७४०८१२ | ९८००० | ६ महिने | ११८० | वर्ग ४ व वरील |
| ५ | किल्ले रायगड येथील छोट्या पाण्याच्या टाक्यांचे विशेष दुरुस्ती, जतन व संवर्धन करणे. | ६२४०८१५ | ६३००० | ६ महिने | ११८० | वर्ग ४ व वरील |
| ६ | किल्ले रायगड येथे ASI टिकिट कक्ष ते होळीचा माळ पदपथावर विसावा शेड उभारणे, ता. महाड, जि. रायगड | ५८२२६०९ | ५९००० | ६ महिने | ११८० | वर्ग ४ व वरील |
| ७ | किल्ले रायगड येथील महादरवाजा वरील बाजुस असलेले पाण्याच्या टाक्याचे विशेष दुरुस्ती जतन व संवर्धन करणे, | ३४१६६६१ | ३५००० | ६ महिने | ५९० | वर्ग ५ व वरील |
| ८ | जिजामाता समाधी येथील झाड्झुडपांच तननाशकाच्या सहाय्याने निर्मुलन करणे, ता. महाड. जि. रायगड | २८७३६७१ | २९००० | ६ महिने | ५९० | वर्ग ५ व वरील |
| ९ | खुब लढा व किल्ल्यावरील तटबंदीवरील झाड्झुडपांच तननाशकाच्या सहाय्याने निर्मुलन करणे, ता. महाड, जि. रायगड | २७२९३१५ | २८००० | ६ महिने | ५९० | वर्ग ५ व वरील |
| १० | किल्ले रायगडावर व पाचाड परिसरात माहिती व दिशादर्शक फलक बर्साविणे, | २३७०८४० | २४००० | ६ महिने | ५९० | वर्ग ५ व वरील |
| ११ | किल्ले रायगड व पायरी मार्ग येथे कचरा विल्हेवाट करणे. | १९१३२८० | २०००० | ६ महिने | ५९० | वर्ग ६ व वरील |

**ई निविदेचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदासंच डाऊनलोड व ऑनलाईन निविदा सादर करण्याचा दिनांक व वेळ | दिनांक **०४/०३/२०२४** (सकाळी १०.०० पासून) ते दिनांक **११/०३/२०२४** वेळ १८.०० वाजेपर्यंत |
| २ | ऑनलाईनद्वारे तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचा दिनांक व ठिकाण (शक्य असल्यास) | कार्यकारी अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, महाड यांचे कार्यालयात दि. **१२/०३/२०२४** वेळ १८.०० पासून |

**टिप :–** परिपूर्ण निविदा https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील व ऑनलाईन निविदा सादर करता येतील. सदर निविदांचे सविस्तर वेळापत्रक, शुद्धीपत्रके तसेच इतर काही दुरुस्त्या, शर्ती व अटी या वरील संकेतस्थळांवरच पाहता येतील.

**रा.कि.सेल/माप्रवि/महाड/७०
दिनांक : ०१/०३/२०२४**

**सही/
(महेश रा. नामदे)
कार्यकारी अभियंता
(रायगड किल्ला विशेष स्थापत्य पथक)
मार्ग प्रकल्प विभाग, महाड, जिल्हा रायगड**



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मिळकतीचे वर्णन
मौजे–वारदोली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भूमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| **४८/२ ब** | ०–२१–३०<br>पो.ख. ०–०१–५०<br>**एकूण – ०–०२२–८०** | २.९४ | **अरुणा बारकू तांडेल<br>गुरुनाथ बारकू तांडेल<br>सुरेखा बारकू तांडेल<br>नितिन कानू तांडेल<br>इंदु कानू तांडेल** |
| **४८/६** | **०–१२–१०** | १.६९ | |
| **४८/८** | ०–१४–२०<br>पो.ख. ०–०१–००<br>**एकूण – ०–१५–२०** | १.९४ | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.
दि. ०९/०३/२०२४.**

**सही/–
ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल. मो.क्र. : ९९३०३६९८६१



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या नोटिसीने कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे महसूल दप्तरी वर्णन केलेली जमिनीची मिळकत आमचे अशिलांनी सदरहू मिळकतीचे मालकाकडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. आष्टे ता. पनवेल जि.रायगड**

| मालकाचे नाव | भूमापन क्रमांक | हिस्सा नं | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| ओमप्रकाश भजनलाल अग्रवाल | १३१/२ | | ०.२५.०० | १.६२ |
| | | पो. ख | ०.०२.३० | |
| | | एकूण | ०.२७.३० | |

सदरहू मिळकतीबद्दल कोणाचाही दान, गहाण, बक्षिस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे प्रथम दर्शनीय कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात.

वरील मुदतीत कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहीत असल्याचे गृहीत धरुन आमचे अशिल सदरहू मिळकतीचा वरीप्रमाणेचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणा–या हरकतींचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**पनवेल.
दि. १०/०३/२०२४.**

**सही/–
ॲड मनिषा गायकर**
**पत्ता –** ऑफिस नं. १४, यशोकिरण को. ऑप. हौसिंग सोसायटी, पहिला मजला, सावरकर चौकाजवळ, पनवेल ४१० २०६, जि. रायगड.
फोन नं. ८६५२०३३७६९.



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-26/23-24/70000029689 | Work of anticorrosive coating & Painting of various ICTs Units and Transformers BY APPLYING ONE COAT OF RED OXIDE (Asian make) AND TWO COATS OF Asian make synthetic Enamel paint of light gray grade 631 at 400 kV Nagothane S/S under 400 KV R.S. (O&M) Division Nagothane..2nd call | Rs. 22,49,540.37/ | 15.03.24 up to 23:59 hrs |

**EMD 1% of Estimate cost &** Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-
EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**



MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-03/24-25 /7000030494 | Hiring of LMV (e.g. Swift Dezire or likewise) with AC along with driver and fuel for Executive Engineer, 400 KV R.S. (O&M) Division, Nagothane | Rs 5,58,560.33/- | 15.03.24 up to 23:59 hrs |
| 2 | e-Tender--4/24-25 /7000030495 | Hiring of LMV (e.g. Mahindra bolero or Similar) towards 400 KV Line Main. Sub-Division, Nagothane | Rs 5,77,916.51/- | 15.03.24 up to 23:59 hrs |
| 3 | e-Tender-05/24-25 /7000030496 | hiring of MMV( i.e. Mahindra bolero camper or pickup or likewise) for movement of officers for supervision/ official work for Maintenance & Testing Unit under 400 KV R.S. Nagothane Division | Rs 5,97,235.59 | 15.03.24 up to 23:59 hrs |
| 4 | e-Tender-06/24-25/7000030497 | Hiring of MMV (e.g. Mahindra bolero camper or pickup or likewise) towards 400 KV Line Main. Sub Division, Nagothane under 400 KV R.S Nagothane Division | Rs 5,99,123.07/- | 15.03.24 up to 23:59 hrs |
| 5 | e-Tender-07/24-25 /7000030499 | Hiring of LMV (e.g. Eartiga or likewise) for school going children 7 seater from kansai colony to Nagothane at 400 kV Nagothane s/s under 400 KV R.S. Nagothane | Rs 5,99,203.84/ | 15.03.24 up to 23:59 hrs |

EMD fee 1% of estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID : **ee7230@mahatransco.in** Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-
EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## निवडक



### महिलांसाठी विविध स्पर्धा

**नवी मुंबई :** कोपरखैरणे येथील कै.आ. अण्णासाहेब पाटील बहुउद्देशीय इमारतीमध्ये विविध स्पर्धा महिलांच्या उत्साही उपस्थितीत झाल्या. यामध्ये समूह गायन स्पर्धेत ११ महिला गानसमूहांनी सहभाग घेऊन आपले सुरेल सादरीकरण केले. समूह नृत्य स्पर्धेत १२ महिला नृत्य समूहांनी सहभाग घेतला. समूह नाटिका स्पर्धेमध्ये ६ महिला नाट्यसमूहांनी तसेच महिला भजन मंडळ स्पर्धेमध्ये १० महिला भजन मंडळांनी सहभाग घेऊन आपले सादरीकरण केले. या सर्व स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ १३ मार्च २०२४ रोजी, विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी येथे होणार असून या ठिकाणी महिला, मुली, महिला, बचत गट, महिला मंडळ, महिला संस्था यांनी उत्पादित केलेल्या साहित्याची विक्री करण्यासाठी विनामूल्य स्टॉलदेखील उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

### बेलापूरमध्ये निपुणोत्सव मेळावा

**नवी मुंबई :** विद्यार्थ्यांच्या पायाभूत भाषा व गणित विषयक क्षमता विकसित करण्याच्या दृष्टीने नवी मुंबई पालिका शिक्षणाधिकारी अरुणा यादव यांच्या संकल्पनेतून निपुणोत्सव मेळाव्याचे आयोजन केंद्रस्तरावर करण्यात आले होते. पालिका शाळा क्रमांक ९ नेरूळ येथे समूह साधन केंद्र – बेलापूर यांचा केंद्रस्तरीय निपुणोत्सव मेळावा झाला. या निपुणोत्सवात बेलापूर गटातील १५ शाळांच्या प्रत्येकी दोन विद्यार्थी व एक शिक्षक यांनी सहभाग घेतला होता. परिसरातील पालक व विद्यार्थी यांनी या मेळाव्यास भेट देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. या मेळाव्यास मुख्याध्यापक सुवर्णा मिसाळ, मनोहर घरत, नलिनी चौधरी, संगिता ठुबे आदी उपस्थित होते.

### क्रिकेट स्पर्धेचा निधी अनाथाश्रमाला

**नवी मुंबई :** कै. कुंदन गजानन तांडेल आणि कै. कांचन कृष्णा तांडेल यांच्या स्मृतीपित्यर्थ आयोजित केलेली समालोचक चषक २०२४ ही स्पर्धा झाली. या स्पर्धेतून जमा झालेला निधी जीव–ज्योती अनाथाश्रमाला सुपूर्द करण्यात आला. या वेळी अनाथाश्रम चालवणारे सचिन जाधव यांचा सत्कार करण्यात आला. नवी मुंबई आणि रायगडमधील लेजेंट समालोचकांचाही सत्कार या वेळी करण्यात आला. ही स्पर्धा फ्रेंड सर्कल ग्रुप आणि करावे ग्रामस्थ यांनी आयोजित केली होती. स्पर्धेचे संयोजक अमर भोईर व राकेश तांडेल होते. स्पर्धेचा निस्वार्थी हेतू पाहून अनेक सामाजिक कार्यकर्ते, राजकारण्यांनी स्पर्धेला आर्थिक मत्त करत अनाथाश्रमाच्या मदतीला हातभार लावला.

# नवी मुंबईमध्ये विकासकामांचा धूमधडाका

## तब्बल १६ कोटी रुपयांच्या कामांचे भूमिपूजन

**नवी मुंबई : बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांचा बेलापूर विधानसभा क्षेत्रामध्ये विकासकामांचा धडाका सुरू आहे. त्याचे भूमिपूजन व लोकार्पणदेखील सुरू आहेत.

नवी मुंबईच्या विकास बरोबरच आपल्या मतदार संघामध्ये मुलभूत सोई सुविधांचा विकास करण्याच्या कामांसाठी शासनाकडून अनुदान देण्यात येते या अनुषंगाने बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या प्रयत्नांतून रविवारी (दि. १०) सायन–मुंबई महामार्गावर वाशी येथील जंक्शनची काँक्रिटने सुधारणा करणे, सायन–पनवेल महामार्गावर नेरूळ व वाशी उड्डाणपुलाच्या दोन्ही मार्गिकेच्या डांबरी पृष्ठभागाची मास्टी व वाशी जंक्शनचे काँक्रिटने सुधारणे करणे तसेच सायन–पनवेल महामार्गावर सीबीडी बेलापूर जंक्शनचे काँक्रिटने सुधारणे करणे ही तिन्ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत येत असल्याने या सर्व कामांचा मोठ्या उत्साहात भूमिपूजन करण्यात आले.

सार्वजनिक बांधकाम विभागातील उपस्थित असलेल्या अधिकारी वर्गानी सदर जागेची पाहणी करून नवी मुंबईतील नागरिकांना ज्या काही सोई सुविधा पाहिजे त्यांचे निरसन करून ते काम लवकरच सुरू होणार असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले. तसेच गेल्या



आठवड्यापूर्वी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सायन–पनवेल महामार्गावरून बाहेरगावी जाणाऱ्या एसटी महामंडळाच्या बसेस थांबत असतात. वाशी, नेरूळ, बेलापूर येथे एसटी थांबे आहेत या थांब्यावर प्रवाशांना कोणतीही सुविधा नसल्याने अनेकदा प्रवाशी त्रासलेले आढळतात त्यांच्या करिता प्रतिक्षा कक्ष, सुसज्ञ उद्यान तसेच शौचालय या सुविधा प्राप्त होणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचबरोबर रस्त्याचे काँक्रिटीकरण व डांबरीकरण करून वाहनांना ये–जा करण्याकरिता सोयीचे होणार असून पावसळ्यात जे खड्डे पडून अपघात होतात त्याचे प्रमाण कमी होणार आहे. त्याकरिता या सर्वांन कामासाठी तब्बल १६ कोटी ३८ लाख रुपये खर्च सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करित आहोत.

या वेळी उपविभागीय अभियंता पवार, कार्यकारी अभियंता कल्याणी गुप्ता, शाखा अभियंता सागर भुले, शाखा अभियंता जगदाने, दत्ता घंगाळे, सुधीर जाधव, प्रवीण भगत, रुपेश मढवी, ज्ञानेश्वर कोळी, जयराम पासवान, आरती राउळ, चैताली ठाकूर आदी उपस्थित होते.

# महिला दिनी संगीतमय कार्यक्रम

**पनवेल : प्रतिनिधी**

महिला दिनी संवेदना चॅरिटेबल संस्था पनवेलने मराठी पाऊल पडते पुढे या संगीतमय कार्यक्रमाचे माध्यमातून विस्मरणात गेलेल्या मराठी गाणी, नृत्य आणि सिनेकलाकार यांच्या महान कार्यावर प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला. संवेदनाने महिला दिन टीव्ही क्षेत्रातील दादासाहेब फळके पुरस्कार विजेत्या दोलांजली राजशिर्के उपस्थितीत साजरा केला.

सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेली संवेदना संस्था दरवर्षी एक सामाजिक विषय घेऊनच महिलादिन साजरा करत असते. या वर्षीचा विषय होता. चित्रपट सृष्टीचे जनक दादासाहेब फाळके एक आगळे–वेगळे महान व्यक्तिमत्व होते. ज्यांचे चित्रपट सृष्टीतील योगदान खूप उंचावरचे आहे. मराठी असूनही याची अनेकांना माहिती सुद्धा नाही आणि म्हणूनच या वेळी महिलादिन याच विषयावर प्रकाश टाकणारा होता. दरवर्षी संस्थेतर्फे विशेष कामगिरी केलेल्या महिलेला दिला जाणारा मिसेस संवेदना हा मानचा 'किताब आरती दामले यांना तर स्त्री शक्ती पुरस्कार साधना गोसावी यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला.

या वेळी मराठी पाऊल पडते पुढे या संगीतमय कार्यक्रमाचे ही आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे विशेष म्हणजे पन्नासाव्या शतकापासून विस्मरणात गेलेल्या मराठी गाणी, नृत्य आणि सिनेकलाकार यांच्या महान कार्यावर प्रकाशझोत टाकण्यात आला. चाकोरी बाह्य विषय घेऊन तो विषय समाजापर्यंत पोहचवून संस्थेतील महिलांचा स्वतःचा आत्मविश्वास वाढवण्यास मदत करणे आणि महाराष्ट्रात होत असलेल्या मराठी भाषेची अवहेलना थांबवणे हा याचा उद्देश्य असल्याचे अध्यक्षा सुनेत्रा गवाणकर यांनी या वेळी सांगितले.



# कामोठ्यात आरोग्यदायी उपक्रम





**कामोठे : रामप्रहर वृत्त**

स्वर्गीय मितेश रवींद्र जोशी यांच्या स्मरणार्थ रविशेठ जोशी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने साई समर्थ हॉस्पिटल यांच्या सेवे अंतर्गत मोफत भव्य महाआरोग्य शिबिर, रक्तदान, डोळे तपासणी आणि मोफत चष्मे वाटप शिबिराचे आयोजन कामोठे सेक्टर ३५ येथे करण्यात आले होते. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी रविवारी (दि. १०) भेट दिली.

या शिबिरामध्ये जनरल तपासणी, दंत तपासणी, हाडांचे आजार तपासणी, स्त्रीरोग तपासणी, ईसीजी, रक्तदाब चाचणी, रक्त चाचणी तसेच जेष्ठ नागरिकांसाठी डोळे तपासणी आणि मोफत चष्मे वाटप करण्यात आले. यासारख्या सुविधा नागरिकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या.

या वेळी कामोठे शहर मंडळ अध्यक्ष रवी जोशी, शहर अध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, संदीप पाटील, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश गायकर, जिल्हा चिटणीस विद्याताई तामखेडे, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, कामोठे शहर मंडळ महिला मोर्चा अध्यक्षा वनिता पाटील, पनवेल पंचायत समिती माजी सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, युवा मोर्चा उपाध्यक्ष राहुल बुधे, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, समाजसेवक प्रदीप भगत, समाजसेवक जयेंद्र जोशी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# उरण रेल्वेने गतिमान प्रवास

**उरणकरांचे स्वप्न असलेल्या उरण ते नवी मुंबई मार्गावरील खारकोपर–उरण या दुसऱ्याटप्प्यातील लोकलसेवेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अटल सेतू लोकार्पण सोहळ्यातून दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवला. या मार्गावरील नवी मुंबई ते खारकोपर हा टप्पा यापूर्वीच सुरू झालेला आहे. आता उरणकरांना नवी मुंबईपर्यंत तसेच पुढे मुंबई, ठाणे असा प्रवास रेल्वने करता येतोय. ही रेल्वेसेवा मोदी सरकारच्या विकासाची गॅरंटी दर्शवत आहे. दै. रामप्रहरच्या वाचकांसाठी या रेल्वेसेवेची सविस्तर माहिती देणारी लेखांची मालिका.**

**विकासाची गॅरंटी**

मागील २७ वर्षे सुरु होण्यापासून प्रतिक्षेत असलेली उरण – नेरुळ रेल्वे लोकल अखेर उरणचे आमदार महेश बालदी यांच्या पाठपूराव्यानंतर १२ जानेवारीला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुभारंभ होऊन सुरु करण्यात आली. तर यातील नेरूळ – खारकोपर हा टप्पा मागील काही वर्षात सुरु करण्यात आला, मात्र उरण – नेरूळ रेल्वे मार्गातील अनेक अडथळे दूर करण्यासाठी अधिक कालावधी लागला.

मध्यरेल्वेच्या अधिकाऱ्यांकडून जाहीर करण्यात आलेल्या उरण – नेरुळ रेल्वे लोकल सुरु होण्याच्या बऱ्याच डेडलाईन हुकल्याने १२ जानेवारी २०२४पर्यंत उरण वासियांना रेल्वे लोकल सेवेची प्रतिक्षा करावी लागली होती.१२ जानेवारीला ही लोकल सेवा सुरू झाल्याने येथील नागरिकांचा प्रवास गतिमान होऊन उरण तालुक्यातील विकासाला चालना मिळत असून आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी न्हावा–शिवडी सेतू आणि अन्य प्रकलपांचे लोकार्पण सोहळ्यासाठी येणार असल्याचे निश्चित झाल्याने झाल्याने आमदार महेश बालदी यांनी विशेष लक्ष घालून रेल्वे मार्गातील अडथळे दूर करण्यासाठी मध्यरेल्वे आणि सिडको प्रशासनाकडे पाठपुरावा करून पंतप्रधान मोदी यांच्या दौऱ्यातच उरण–नेरूळ लोकल रेल्वे मार्ग सुरु करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांना यश प्राप्त होऊन उरण– नेरूळ रेल्वे लोकल सेवा प्रत्यक्षात उतरवली. त्यामुळे या मार्गांवरून दर दिवशी हजारो प्रवासी पहिल्या दिवसापासूनच प्रवास करू लागले.

मागील कित्येक वर्षांपासून वाहतूक कोंडी, अपघाताने बेजार झालेल्या प्रवाशांचा वेळ आणि प्रवास खर्च कमी झाल्याने येथील प्रवासी वर्गातील आनंद व्यक्त होत आहे. **(क्रमश:)**

**–जीवन केणी**



# महिलांना कर्करोग प्रतिबंध मार्गदर्शन

## पनवेलच्या नील हॉस्पिटलमध्ये उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनानिमित्त बीके डॉ. शुभदा नील यांनी महिलांना गर्भाशयाच्या मुखाचा आणि स्तनाचा कर्करोग प्रतिबंध यावर मोलाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला बी.के. तारादीदी यांचे आशीर्वाद लाभले. दीदींनी महाशिवरात्रीचे आध्यात्मिक महत्त्व विषद केले. कार्यक्रमाला डॉ. कविता चौतमोल माजी महापौर पनवेल, डॉ. चारुशीला घरत माजी उपमहापौर, वर्षा ठाकूर, राजश्री वावेकर नगरसेविका, श्वेता शेट्टी, वर्षा मराठे, दमयंती म्हात्रे, मंगला गडमुळे, सोनम सिंग, कमलाकर घरत, पत्रकार मिलिंद खारपाटील, सिरम इन्स्टिटयूटचे श्री. द्रविड, लायन्स क्लबचे श्री. सामंता, महावीर इंटरनॅशनलचे सपन बर्धन, माजी एसीपी एसपी पाटील, आरएसएसचे नरेंद्र गुरव आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

नील हॉस्पिटल नवीन पनवेल येथे कॅन्सरची लसीकरण व तपासणी यावर सूट देण्यात येते. तरी याचा लाभ जास्तीत जास्त महिलांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. शुभदा नील यांनी केले आहे.



# पनवेल शहर वाहतूक शाखेतर्फे अबोली रिक्षाचालकांना शुभेच्छा



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर वाहतूक शाखा यांच्या वतीने शहरातील अबोली रिक्षाचालकांना महिला दिनाचे औचित्य साधून शुभेच्छा दिल्या.

पनवेल शहर वाहतूक शाखा यांचे वतीने उपआयुक्त तिरुपती काकडे, सहाय्यक पोलीस आयुक्त बोंडे यांचे संकल्पनेतून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय पाटील शहर वाहतूक शाखा पनवेल व सहकारी महिला व पुरुष अंमलदार यांनी शुक्रवारी (दि.८) पनवेल शहरातील अबोली रिक्षा चालक यांना महिला दिनाचे औचित्य साधून पुढील वाटचालीस शुभेच्छा देऊन वाहतुकीचे नियमन पाळणे तसेच तुम्ही धाडसाने हे काम करीत असल्याबाबत शुभेच्छा देऊन योग्य ते मार्गदर्शन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



**पनवेल : येथील साईबाबा मंदिर या ठिकाणी जे.के. इंटरप्राईजेसचे दूध डेअरी हे दुकान सुरु झाले आहे. कलाईयाझाकी वेलमुरुगन, सुबालक्ष्मी थंगापांडियन यांनी हे दुकान सुरू केले आहे. या दुकानाचे उद्घाटन महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी माजी नगरसेवक अजय बहिरा, तेजस कांडपिळे आदी उपस्थित होते.**

# पनवेलमध्ये पीयर एज्युकेटरचा सन्मान



**पनवेल : प्रतिनिधी**

महिला दिनाच्या निमित्ताने आश्रय सोशल फाउंडेशन च्या वतीने पनवेल येथील कार्यालयात महिलांना, सामाजिक बांधिलकीचे भान राखून एच.आय.एडस. या जीवघेण्या रोगांवर जनजागृती केली. या वेळी उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व पीयर एज्युकेटरना (सोबती) प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. त्यानंतर उपस्थित सर्व महिलांना शुभेच्छा देण्यात आल्या.

आश्रय सोशल फाउंडेशन पनवेल हि संस्था मागील १५ वर्षा पासून पनवेलमध्ये महिला सक्षमीकरण, देहविक्रय करणाऱ्या महिलांचा उत्कर्ष, तृतीयपंथीयांचे हक्क आणि वंचीत मुलांचे शिक्षण ई.समाजोपयोगी विषय घेऊन काम करत आहे. यासाठी मदत करणाऱ्या पिअर एज्युकेटरचा महिला दिना निमित्त शुक्रवारी संस्थेच्या पनवेल येथील कार्यालयात अध्यक्ष अशोक गायकवाड व संचालिका विमल गायकवाड यांचे हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

या वेळी प्रोजेक्ट व्यवस्थापक उर्मिला यादव, शिल्पा हलणकर, दिक्षिता गावंड, रुकैया बारगीर, मनाली घोसळकर, अश्विनी सावंत, आश्रयच्या मनीषा पवार, संजीवनी सावंत, मीनल मोहिते, प्रज्ञा कांबळे, सुषमा पवार, प्राजू खंडगाळे, सुषमा मांडलेकर, राखी कचरे व ज्योति मगरे उपस्थित होते.

# सुपारीला भौगोलिक मानांकन देणार -कृषीमंत्री धनंजय मुंडे

## दिवेआगर येथे विस्तारित सुपारी संशोधन केंद्राचे भूमिपूजन



**रायगड : रामप्रहर वृत्त**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ दापोली अंतर्गत सुरू असलेले श्रीवर्धन येथील सुपारी संशोधन केंद्राचे दिवेआगर येथील दोन हेक्टर क्षेत्रावर विस्तारित संशोधन केंद्र असून यासाठी पाच कोटी निधी उपलब्ध झाला आहे. या सुपारी केंद्राचे भूमिपूजन राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते रविवारी (दि. १०) झाले.

या कार्यक्रमास खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरू संजय भावे, दिवेआगर सरपंच सिद्धेश कोसबे, संशोधन संचालक डॉ. प्रशांत शिणगारे, कुलसचिव डॉ. प्रदीप हळदवणेकर, विद्यापीठ अभियंता निनाद कुलकर्णी, उपसंचालक डॉ.अरुण माने, डॉ. राजेश धोपावकर, प्रभारी अधिकारी संशोधन केंद्र डॉ.सिद्धेश्वर सावंत, तांत्रिक सल्लागार डॉ.किरण माळशे, उपअभियंता राहुल घाडगे यांच्यासह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी कृषीमंत्री धनंजय मुंडे म्हणाले की, सुपारी या फळाला आपल्या जीवनात वेगवेगळ्या स्वरूपात महत्व आहे. श्रीवर्धनच्या सुपारीला तसेच रोहाच्या वाल यांना भौगोलिक मानांकन देण्यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात येतील. भाताची शेती करीत असलेल्या शेतकरी कधीच आत्महत्या करीत नाही. यामध्ये कोकणातील शेतकरी अतिशय समाधानाने शेती करीत समृद्ध होत आहे. महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठाचे आंतरराष्ट्रीय कंपन्यांसोबत करारबद्ध करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. कृषीमंत्री असल्याच्या आताच्या काळात कृषी विभागाने मोठी क्रांती केली असून महाराष्ट्रातील सर्वांत सामान्य शेतकऱ्याचीसुद्धा आर्थिक उन्नती होईल.

खासदार सुनील तटकरे यांनी कृषीमंत्री धनंजय मुंडे यांच्या कारकीर्दीमध्ये दिवेआगर येथे होत असलेले सुपारी संशोधन केंद्र हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे हे आमचे स्वप्न असल्याचे सांगितले.


आपल्या मनोगतामध्ये महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, सुपारी संशोधन केंद्राचा पर्यटनाच्या वाढीसाठीदेखील फायदा होईल. महिलांसाठी शेती उद्योगासाठी विशेष उपक्रम राबवावे, जेणेकरून महिलांना शेती व्यवसायाकडे वळविता येईल व त्यातून महिला सक्षमीकरणाला हातभार लागेल.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने वसंतराव नाईक कृषिभूषण देऊन शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

# खोरा बंदरात नवीन जेट्टीचे काम प्रगतिपथावर

**मुरूड : प्रतिनिधी**

खोरा बंदर येथे नवीन जेट्टीचे काम ऑक्टोबर २०२३मध्ये सुरू करण्यात आले आणि आज हे काम प्रगतिपथावर असल्याचे दिसून येते. मेअखेरपर्यंत ही जेट्टी पर्यटकांच्या सुविधेसाठी वापरात येईल, असा विश्वास महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डाकडून व्यक्त करण्यात येत आहे. सध्या या जेट्टीचे काम जोरदार सुरू असून ते लवकरात लवकर पूर्ण करण्याचा मानस संबंधित ठेकेदाराने व्यक्त केला आहे.



गृह व बंदर विभागाने ६ एप्रिल २०२२ रोजी खोरा बंदर येथे असणाऱ्या प्रवासी जेट्टीची उंची व लांबी वाढवण्यासाठी १११ कोटी २६ लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता तसेच जेट्टीला आवश्यक असणाऱ्या सुविधा पुरविण्यासाठीसुद्धा अतिरिक्त निधी देण्यात आला. सध्या अस्तित्वात असलेली जुनी जेट्टीवरून ओहटीच्या वेळी प्रवासी वाहतूक करणे अडचणीचे होत असल्याने कामास तातडीने निधी मंजूर करण्यात आला. सुमारे १५० मीटर पाण्याच्या आत नवीन जेट्टीचे काम केले जाणार असल्याने ओहटीच्या वेळी प्रवास करताना कोणताही त्रास प्रवासीवर्गाला होणार नाही. जुन्या जेट्टीची लांबी कमी असल्याने ओहटीच्या वेळी प्रवासी होड्या अडकून पडत असत. ही अडचण लक्षात घेऊन नवीन जेट्टी बांधताना तिची लांबी वाढविण्यात आली आहे.

खोरा बंदरातून सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्यावर पर्यटकांना सहज जाता येता यावे यासाठी ही जेट्टी खूपच उपयुक्त ठरणार आहे. जंजिरा किल्ल्यावर दरवर्षी राजपुरी व खोरा बंदरातील जेट्टीवरून सात लाखांपेक्षा जास्त पर्यटक या किल्ल्यास भेट देत असतात. पर्यटकांच्या माध्यमातून प्रवासीवर्गाच्या मागे ठराविक लेवी कर आकारला जाऊन त्याचे उत्पन्न महाराष्ट्र मेरीटाइम बोर्डास मिळत असते..

### पर्यटकांसाठी फायदेशीर

*ऐतिहासिक व प्रसिद्ध अशा जंजिरा किल्ल्यावर जाण्यासाठी राजपुरी नवीन जेट्टी व खोरा बंदरातून पर्यटकांना किल्ल्यापर्यंत पोहचवले जाते. या दोन्ही बंदरांत तुफान गर्दी सुट्टीच्या हंगामात होत असते. त्यामुळे खोरा बंदरातील नवीन जेट्टी ही वरदान ठरणार आहे. लांबी व रुंदी जास्त असल्याने या जेट्टीवरून शेकडो पर्यटक अगदी सहज चढू व उतरू शकणार आहेत. ओहटीच्या वेळी नवीन जेट्टी खूपच आवश्यक ठरणार असून पर्यटकांचा खोळंबा होणार नाही.*

# चौकमध्ये महिलांसाठी आरोग्य शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

जागतिक महीला दिनाचे औचित्य साधून चौक ग्रुप ग्रामपंचायतीच्या वतीने आणि श्रीपाद हॉस्पिटल च्या सहकार्याने आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करून महिला दिन साजरा करण्यात आला.

महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन सरपंच रितु ठोंबरे यांच्या विशेष प्रयत्नाने करण्यात आले होते. यात पिवळे व केशरी रेशनकार्डधारकांना अँजिओग्राफी आणि बायपास मोफत ठेवण्यात आली होती. या वेळी महिलांच्या आरोग्य समस्यांचे निवारण करण्यात आले. रक्त तपासणी, मधुमेह, रक्तदाब, ऑक्सिजन लेव्हल, गुडघेदुखी, पाठदुखी, कंबरदुखी, टाचदुखी, हातापायाला मुंग्या येणे, चक्कर येणे, अशक्तपणा आणि आयुर्वेदिक पंचकर्म चिकित्सा व सल्ला देण्यात येऊन मोफत औषधे वाटप केली. या तपासण्या तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली करण्यात आल्या.

या वेळी ग्रामविकास अधिकारी एस.पी. जाधव, उपसरपंच राजन गावडे, सुभाष पवार, प्राची दबके, लक्ष्मी वाघ, विधीतज्ज्ञ रीना सोनटक्के, नयना झिंगे, पूजा हातमोडे, सुवर्णा राणे, ऋषाली पोळेकर, अश्विनी म्हात्रे, स्वाती देशमुख यांच्यासह अनेकांनी या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



# थेरोंडा शाळेत विद्यार्थ्यांचा मार्केट डे

**रेवदंडा : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांसाठी मार्केट डेच्या माध्यमातून थेरोंडा राजिप शाळा येथे विद्यार्थ्यांनी बनविलेले विविध खाद्य जिन्नस विक्रीस ठेवत त्यांना आर्थिक देवाणघेवाणाचे व्यवहार ज्ञान व अनुभवाचे धडे दिले. शिक्षक व विद्यार्थ्यांनी राबविलेल्या या उपक्रमास पालक व ग्रामस्थांनी सहभागी होत मोठा प्रतिसाद दिला.



थेरोंडा राजिप शाळा नं.२ येथे सकाळी १० ते दुपारी २ या दरम्यान मार्केट डेचे आयोजन करण्यात आले होते. गुणवत्तापूर्ण शिक्षण देताना विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञानासोबत गणित, खरेदी-विक्री सृजनशिलता, व्यवसाय शिक्षण यांचे अनुभव मिळावे यासाठी शाळा व शिक्षकवर्गाने हा उपक्रम राबविला होता. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी स्वतः घरून बनवून आणलेले विविध खाद्या जिन्नस टेबल मांडून विक्रीस ठेवले होते. यामध्ये भेळ, सुकट भाकरी, वडे, समोसा, मिसळ, उसळ आदींचा समावेश होता. स्थानिक ग्रामस्थ व पालकवर्गाने या उपक्रमात सहभागी होत खाद्य जिन्नस खरेदी करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

या उपक्रमास रेवदंडा ग्रामपंचायत उपसरपंच मंदाताई बळी, बबिता खंडेराव, दिक्षा बळी, माधुरी चौलकर आदींसह पालक व ग्रामस्थांनी भेट देऊन विद्यार्थ्यांचे कौतुक केले. उपक्रमासाठी मुख्याध्यापिका मानकर, शिक्षक संजय नागवेकर, प्रभाकर धसाडे, विजय गुरव, शिक्षिका सरोज पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले.

# महिला दिनानिमित्त माणगावात नारीशक्तीचा सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त शुक्रवारी (दि.८) येथील शासकीय विश्रामगृह माणगाव या ठिकाणी नगराध्यक्ष तथा संस्थेचे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या हस्ते नारीशक्तीचा सन्मानचिन्ह, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.



या वेळी माणगाव नगरपंचायतीच्या स्वच्छता समिती सभापती शर्मिला सुर्वे, सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा जाधव, पोलीस उपनिरीक्षक अस्मिता पाटील, एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण सोनाली तेटगुरे, परिचारिका शिवकांती गवळी, डॉ. केतकी क्षीरसागर, संस्था सदस्य शर्मिला सत्वे, नगरसेविका ममता थोरे तसेच यशोधरा गोडबोले, स्वप्ना साळुंके, विनया जाधव, विनया ढेपे, अपूर्वा जंगम, कल्पना पाखुर्डे, दीप्ती मोरे आदी महिलांचा सन्मान करण्यात आला, तर नगराध्यक्ष तथा संस्थेचे कार्याध्यक्ष ज्ञानदेव पवार यांना अविष्कार फाउंडेशन इंडिया (कोल्हापूर) या संघटनेतर्फे राज्यस्तरीय संत गाडगेबाबा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सत्कारमूर्ती महिलांनी त्यांचे व संस्था अध्यक्ष सलीम शेख यांनी सर्व सहकाऱ्यांना सोबत घेऊन विविध कार्यक्रम यशस्वीपणे राबविल्याने त्यांचेही अभिनंदन करण्यात आले.

ज्ञानदेव पवार यांनी या कार्यक्रमाचे विशेष कौतुक करून महिलांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. सत्कारमूर्तींनी मनोगत व्यक्त करताना संस्थेने सन्मानित केल्याबद्दल आभार व्यक्त केले. प्रास्ताविकात संस्था अध्यक्ष सलीम शेख यांनी सत्कारमूर्ती महिलांच्या कार्याची माहिती देऊन त्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमास उपनगराध्यक्ष राजेश मेहता, नगरसेवक कपिल गायकवाड, संस्थेचे कायदेशीर सल्लागार भालचंद्र खाडे, सचिव शंकर शिंदे, खजिनदार अरुण क्षीरसागर, ज्येष्ठ पत्रकार मजिद हाजिते, आजेश नाडकर, सचिन देसाई, विवा कॉलेजचे प्राचार्य विवेक ढेपे, सहसचिव उमेश यादव, प्रा. हर्षल जोशी, प्रसाद धारिया, सचिन पेंडसे, शेखर घाग, अजित शेडगे, अमोल पवार, नितीन शेलार, संदीप म्हामुणकर, राजू सुतार, ग्रामसेवक राजेंद्र तेटगुरे, सामाजिक कार्यकर्ते दीपक मोरे, संजय गवळी, काजल डान्स अकॅडमीच्या संस्थापिका काजल पाखुर्डे, रश्मी तेटगुरे, नंदिनी जाधव आदी उपस्थित होते.

# कर्जतमध्ये महाशिवरात्रीनिमित्त मैफल रंगली

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथील श्री कपालेश्वर मंदिर देवस्थानच्या वतीने महाशिवरात्रीनिमित्त द स्वरबरसात इव्हेंट प्रस्तुत, तोचि खरा साधू, तोचि खरा संत ही सुप्रसिद्ध गायक, संगीतकार स्व. सुधीर फडके उर्फ बाबूजी यांनी गायलेल्या गीतांची विवेक भागवत निर्मित संगीत मैफल रंगली. या मैफलीत गायकांनी सादर केलेल्या गीतांनी कर्जतकर मंत्रमुग्ध झाले.




संगीत मैफलीचे आयोजन श्री कपालेश्वर मंदिराच्या सभागृहात करण्यात आले होते. देवस्थानचे अध्यक्ष महेंद्र बोडके यांनी उपस्थितांचे स्वागत केले. त्यानंतर संगीत मैफलीचा शुभारंभ करण्यात आला. या मैफलीत ज्योती कलश..., कानडा राजा पंढरीचा..., आदि माया..., तोच चंद्रमा नभात..., आज चांदणे उन्हात हसले..., सखी मंद झाल्या तारका..., का रे दुरावा..., स्वयें श्रीराम प्रभू..., राम जन्मला..., स्वयंवर झाले..., सेतू बांधा रे..., अशी पाखरे येती..., तोचि खरा साधू..., फिटे अंधाराचे जाळे..., जिवलगा कधी रे येशील तू..., स्वर आले..., एकाच या जन्मी जणू..., धुंदी कळ्यांना धुंदी फुलांना..., अहो सजणा दूर व्हा..., ने मजसी ने... अशी एकापेक्षा एक सरस गीते 'सारेगमप' फेम गायिका जयश्री करंबेळकर आणि 'सुर नवा ध्यास नवा' फेम प्रणय पवार यांनी सादर केली. त्यांना तबल्यवर विवेक भागवत, सिंथेसायझरवर नरेंद्र सकटे आणि ऑक्टोपॅडवर यश हजारे यांनी साथ सांगत दिली. अनुया गरवारे-धारप यांनी खास शैलीत निवेदन करून मैफलीत रंगत आणली.

या मैफलीला ॲड.राजेंद्र निगुडकर, राहुल वैद्य, विजय बेडेकर, पांडुरंग गरवारे, जयेश भट, विराज वैद्य, आनंद कुलकर्णी, ईश्वर आरेकर, दत्तात्रेय भागवत, मिलिंद धारप, प्रज्ञा परांजपे, संतोष वैद्य, गणेश खराटे, गोविंद तीर्थकर, रीमा वैद्य, शैलेश सातपुते, अभिजीत मराठे, प्रशांत कारुळकर, सदानंद जोशी, संदीप भोईर, आशिष गोखले, समीर सोहनी आदींसह कर्जतकर उपस्थित होते.

# नांदगाव केंद्राचा बालमेळावा जल्लोषात साजरा

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड पंचायत समिती नांदगाव अंतर्गत समूह साधन केंद्राच्या वतीने आनंददायी बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या केंद्रात जिल्हा परिषदेच्या २० शाळेचा अंतर्भाव होतो. सर्व शाळांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या विविध शैक्षणिक स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

बालमेळाव्याचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्यासमवेत जिल्हा स्काऊट गाईडचे जिल्हा समादेशक उपस्थित होते. केंद्रप्रमुख दिनेश म्हात्रे, संयोजक हेमकांत गोयजी, रूपेश बांद्रे, हेमंत नांदगावकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले.

या वेळी विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम, हस्ताक्षर स्पर्धा, इंग्रजी साभिनय कविता स्पर्धा, इंग्रजी प्रतिज्ञा पाठांतर स्पर्धा, इंग्रजी गोष्ट सादरीकरण स्पर्धा, चित्र रंगभरण स्पर्धा व प्रश्नमंजुषा इ. स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेतील विजेत्यांना ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आल्याचे कार्यक्रमाचे संयोजक हेमकांत गोयजी यांनी सांगितले.

कोरोनानंतर पहिल्यांदाच नांदगाव केंद्राने आनंददायी बालमेळाव्याचे आयोजन करून शैक्षणिक गुणवत्तेस पूरक कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल गटशिक्षणाधिकारी सुनील गवळी यांनी नांदगाव केंद्रातील शिक्षकांचे कौतुक केले. अशाच प्रकारच्या गुणवत्तापूर्ण कार्यक्रमासाठी येत्या शैक्षणिक अर्थसंकल्पात तरतूद केली जाईल, असेही त्यांनी जाहीर केले. विविध स्पर्धांचे परीक्षक म्हणून जलदिप तांडेल, राजेंद्र पाटील, संगीता खानावकर, सारिका वाटवे, हर्षा नांदगावकर, बाळासाहेब फुंदे, पल्लवी भोईर, राजेंद्र साळावकर, प्रमोदिनी म्हात्रे, नरेश पाकले, जयवंत देडगे, श्रद्धा म्हात्रे आदींनी काम पाहिले; तर मनिषा वाघरे, रंजिता केमकर, गजानन दांडेकर, राम कमाने, सुरेश कणसे, अनंत थळे, मंगेश गोयजी, चेतन चव्हाण, राजेंद्र बुल्लू, ओंकार भोई आदींनी सहकार्य केले.





# हरमनप्रीतची विस्फोटक फलंदाजी

## गुजरातवर विजय साकारत मुंबई प्लेऑफमध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

हरमनप्रीत कौरने १० चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने केलेल्या ९५ धावांच्या विस्फोटक फलंदाजीच्या जोरावर मुंबई इंडियन्सने गमावलेला सामना जिंकला. महिला प्रीमियर लीगमध्ये शनिवारी झालेल्या सामन्यात मुंबईला गुजरात जायंट्सविरुद्ध विजयासाठी शेवटच्या पाच षटकांत ७२ धावांची गरज असताना हरमनने अचानक आपला गियर बदलत एकामागून एक चेंडू थेट सीमारेषेबाहेर धाडले आणि बघता बघता एक चेंडू राखून मुंबईच्या संघाने दिमाखदार विजय मिळवला. या विजयासह मुंबईने प्लेऑफमध्ये धडक दिली.



प्रथम फलंदाजी करताना गुजरात जायंट्सने सात गड्यांच्या मोबदल्यात १९० धावा केल्या. बेथ मुनीने ३५ चेंडूंत आठ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने ६६ धावा केल्या, तर हेमलताने ४० चेंडूंत नऊ चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने सर्वाधिक ७४ धावा केल्या. अखेरच्या सामन्यात भारती फुलमणीने १३ चेंडूंत एक चौकार आणि एक षटकाराच्या मदतीने नाबाद २१ धावा केल्या. मुंबई संघाने आठ गोलंदाज बदलले, मात्र धावांचा प्रवाह रोखण्यात अपयश आले. एका क्षणाला तर धावसंख्या सहज २०० चा टप्पा गाठेल असे वाटले होते, पण मुंबईच्या गोलंदाजांना सूर गवसला.

प्रत्युत्तरात मुंबई इंडियन्सने दमदार सुरुवात करीत हेली मॅथ्यूजने १८ धावा आणि यास्तिका भाटियाने ४९ धावा केल्या, मात्र मॅथ्यूज, नतालिया सीव्हर ब्रंट (२) आणि यास्तिका भाटिया यांच्या विकेट पडल्यानंतर मुंबई अडचणीत आल्याचे दिसत होते, पण संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने जबाबदारी सांभाळत सामना मुंबईच्या दिशेने वळवला. तिने शेवटच्या २७ चेंडूंत तब्बल ७५ धावा केल्या. आता मुंबईच्या खात्यात १० गुण असून संघ गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे.

### खेळी पाहून पंचही झाले चकित!

हरमनप्रीतची विस्फोटक खेळी पाहून सगळेच चकित झाले होते. तिच्या बॅटला स्प्रिंग लावली आहे की काय असेच जणू वाटते होते. सामना संपल्यानंतर हरमनने एक महत्त्वाची गोष्ट सांगितली की, खुद्द पंचांनी विजयानंतर त्याची बॅट तपासली. सामना संपल्यानंतर समालोचकही याबद्दल बोलत होते. सामन्यानंतर बोलताना कौरने सांगितले की, ही तिची सरावाची बॅट आहे. ती ज्या बॅटने खेळत होती तिची पकड थोडी सैल होत होती. त्यामुळे तिने सरावाची बॅट वापरण्याचा निर्णय घेतला आणि त्यानंतर जे घडले ते साऱ्या जगाने पाहिले.

# भारतीय संघाने रचला इतिहास

## आयसीसीच्या तिन्ही फॉरमॅटसह 'डब्ल्यूटीसी'मध्येही नंबर वन!

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंग्लंविरुद्धची पाच सामन्यांची कसोटी मालिका ४-१ जिंकल्याने भारताला मोठा फायदा झाला आहे. या विजयासह रोहित शर्माचा संघ आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) कसोटी क्रमवारीत पहिल्या स्थानावर पोहचला आहे. तो आधीच टी-२० आणि वनडेमध्ये अव्वल होता. अशाप्रकारे भारत एकाच वेळी तिन्ही फॉरमॅटमध्ये नंबर वन बनला आहे. यासह संघाने जागतिक कसोटी अजिंक्यपद (डब्ल्यूटीसी) स्पर्धेमध्येही अव्वल स्थान पटकावत ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

भारतीय संघ आधीच कसोटी आणि टी-२०मध्ये पहिल्या क्रमांकावर होता आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वनडे मालिकेत २-१ असा विजय मिळवल्यानंतर आयसीसी क्रमवारीत एकदिवसीय




क्रिकेटमध्येही पहिले स्थान मिळवले होते. तथापि, एकदिवसीय मालिकेनंतर लगेचच दक्षिण आफ्रिकेविरुद्धची कसोटी मालिका १-१ अशी बरोबरीत सोडवल्यानंतर भारताने पहिला कसोटीतील पहिले स्थान गमावले होते. तेव्हा ऑस्ट्रेलिया संघ पहिल्या स्थानावर विराजमान झाला होता. आता विशाखापट्टणम, राजकोट, रांची आणि धरमशाला कसोटीत इंग्लंडविरुद्ध विजय मिळवल्यानंतर टीम इंडिया पुन्हा एकदा कसोटीतील नंबर वन टीम बनली आहे. भारताने तिन्ही फॉरमॅटमध्ये आपला दबदबा कायम ठेवला आहे.

आयसीसीने आपल्या ताज्या अपडेटमध्ये सांगितले की, कसोटी क्रमवारीत संघाचे आता १२२ रेटिंग गुण आहेत. ऑस्ट्रेलियाचा संघ ११७ रेटिंग गुणांसह दुसऱ्या, तर इंग्लंड १११ रेटिंग गुणांसह तिसऱ्या स्थानावर आहे. आता ख्राईस्टचर्चमध्ये न्यूझीलंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात खेळल्या जाणाऱ्या कसोटीच्या निकालाने काही फरक पडणार नाही आणि भारत कसोटीत पहिल्या क्रमांकावर राहील.

मायदेशात पाकिस्तानविरुद्धच्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत क्लीन स्वीप करून ऑस्ट्रेलियाने कसोटी क्रमवारीत भारताला मागे टाकले होते. आता टीम इंडिया पुन्हा एकदा अव्वल स्थानावर पोहचली आहे. भारत ६८.५१ गुणांच्या टक्केवारीसह आयसीसी डब्ल्यूटीसी क्रमवारीत अव्वल स्थानावर आहे.

# इंग्लंडच्या लाजिरवाण्या पराभवानंतर माजी कर्णधार नासेर हुसेन संतापला

**लंडन : वृत्तसंस्था**

धरमशाला येथे भारत आणि इंग्लंड यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेती शेवटचा सामना पार पडला. या सामन्यात भारताने इंग्लंडचा एक डाव आणि ६४ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर ४-१च्या फरकाने आपल्या नावे केली. आता या मालिकेत इंग्लंडचा पराभव झाल्याने माजी कर्णधार नासेर हुसेनने निराशा व्यक्त केली. त्याचबरोबर इंग्लंडच्या 'बॅझबॉल' शैलीवर संताप व्यक्त केला आहे.

इंग्लंडचा माजी कर्णधार नासेर हुसेनने भारताविरुद्धच्या मालिकेतील ४-१ अशा पराभवावर प्रतिक्रिया दिली आहे. त्याने इंग्लंडच्या फलंदाजांना वैयक्तिक कामगिरीवर काम करण्याचा आणि 'बॅसझबॉल'चे वेड सोडून देण्याचा सल्ला दिला. कसोटी क्रिकेटमध्ये आक्रमकपणे खेळण्यासाठी इंग्लंडने 'बॅसबॉल' शैलीचा अवलंब केला, पण ही रणनीती भारताविरुद्ध त्यांच्या अंगलटी आल्याचे दिसले.

हुसेन म्हणाला, प्रतिस्पर्धी संघाकडे बघा. जीवनाच्या प्रत्येक पैलूप्रमाणे त्यांनी त्यांच्याकडून प्रयत्न केले आणि शिकले. मग आम्ही का कमी पडलो? झॅक क्रॉऊलीला चांगली सुरुवात मिळून मोठी धावसंख्या उभारता आली नाही. चेंडू अगदी नवीन असताना बेन डकेटने आक्रमक पद्धतीचा अवलंब केला तसेच संपूर्ण मालिकेत बेन स्टोक्सची बॅट चालली नाही, कारण तो निव्वळ फलंदाज म्हणून खेळत होता हेही असू शकते. त्यामुळे आता फक्त तुमच्या स्वतःच्या खेळावर लक्ष केंद्रित करा आणि त्यात सुधारणा करा.

# सानव वॉरियर्स संघ चिरनेर प्रीमियर लीगचा मानकरी




**उरण : प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील चिरनेर या इतिहास प्रसिद्ध गावात अभिनव सामाजिक सांस्कृतिक कला क्रीडा मंडळाच्या वतीने चिरनेर प्रीमियर लीग २०२४चे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत सानव वॉरियर्स संघाने विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेत १२ संघांनी सहभाग नोंदविला होता. तीन दिवस डे-नाईट सामने खेळविण्यात आले. द्वितीय क्रमांक ओवी रायडर्स, तर तृतीय क्रमांक महाराष्ट्र केक फायटर संघाने प्राप्त केला. मालिकावीर साहिल चव्हाण, उत्कृष्ट फलंदाज ऋषी नारंगीकर, उत्कृष्ट गोलंदाज मृणाल पाटील, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक म्हणून विनय गोंधळी याची निवड करण्यात आली. विजेते संघ आणि वैयक्तिक उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्या खेळाडूंना बक्षीस देऊन गौरविण्यात आले.





**पनवेल : आई मित्र मंडळ खांदा कॉलनीच्या वतीने आई प्रीमियर लीग ओव्हरआर्म क्रिकेट स्पर्धा महात्मा मैदानात आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत आणि महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत खेळाडूंना प्रोत्साहित केले. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी मोतीलाल कोळी, रोहित कोळी, विनायक कोळी यांच्यासह खेळाडू व क्रीडाप्रेमी उपस्थित होते.**






# ऋषभ पंत यंदाच्या आयपीएललाही मुकणार?

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



आयपीएलचा यंदाचा हंगाम २२ मार्चपासून सुरू होत आहे. यामध्ये रिषभ पंतच्या पुनरागमनाची सर्वांना प्रतीक्षा आहे. दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार पंत गेल्या मोसमात खेळू शकला नाही, कारण कार अपघातात त्याला लिगामेंटला दुखापत झाली होती. पंत या वर्षी पुनरागमन करेल अशी अपेक्षा आहे, परंतु पंतच्या चाहत्यांना मोठा धक्का बसल्याचे दिसत आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार पंतला अद्याप राष्ट्रीय क्रिकेट अकादमी (एनसीए)कडून फिटनेस प्रमाणपत्र मिळालेले नाही.

ऋषभ पंतचा ३० डिसेंबर २०२२ रोजी कार अपघात झाला होता, ज्यात तो गंभीर जखमी झाला. यामध्ये त्याला लिगामेंटला दुखापत झाली. यासाठी त्याच्यावर शस्त्रक्रिया करावी लागली आणि त्यामुळे तो बराच काळ क्रिकेटपासून दूर राहिला. आयपीएल २०२४मध्ये तो पुनरागमन करेल अशी अपेक्षा होती, परंतु आता नवी समस्या उभी राहिली आहे.

पंतला आयपीएलमध्ये खेळण्यासाठी फिटनेस टेस्ट पास करावी लागली होती, पण त्याला क्लिअरन्स मिळू शकला नसल्याची बातमी आहे. पंतची फ्रँचायझी टीम दिल्ली कॅपिटल्सने त्याचा फिटनेस अहवाल मागितला होता, मात्र त्यांना बीसीसीआय आणि संघ व्यवस्थापनाकडून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे पंत आयपीएल खेळण्याआधी अडचणीत सापडला आहे.

वृत्तानुसार, जेव्हा त्यांनी दिल्ली कॅपिटल्सला याबद्दल विचारले तेव्हा त्यांनी या वृत्ताचे खंडन केले नाही. उलट फ्रँचायझीला याबद्दल कोणतीही माहिती नसल्याचे सांगितले.

### फिटनेस प्रमाणपत्राची प्रतीक्षा

दिल्ली कॅपिटल्सचे संचालक सौरव गांगुली यांनी काही दिवसांपूर्वी सांगितले होते की, पंतला एनसीएकडून ५ मार्च रोजी फिटनेस प्रमाणपत्र मिळेल, परंतु अहवालानुसार असे झालेले नाही. एनसीएने त्याला प्रमाणपत्र दिलेले नाही. वृत्तानुसार फिटनेस क्लिअरन्सअभावी पंतला त्याच्या फ्रँचायझीने संघात स्थान दिलेले नाही. पंत खेळला नाही, तर दिल्ली संघाला मोठा धक्का बसू शकतो. संघाचा शेवटचा हंगाम चांगला गेला नाही. या वेळी पंतकडून खूप अपेक्षा होत्या. तो आयपीएलमध्ये खेळू शकणार की नाही हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होईल.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –**मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com